# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥*

**Vol.-5** **Issue - 1** **जुलै - २०१२** **July 2012**


## संपादकीय

**प्रिय सभासदमित्रांनो,**

ह्या वर्षी वरुणराजा जरा उशीरानेच आपल्यावर प्रसन्न झाल्याने आणि जूनऐवजी जुलै महिन्यात पावसाला सर्वत्र सुरुवात झाली. आपण सर्वजण आणि विशेषत: शेतकरी वर्ग त्याची चातकाप्रमाणे वाट पाहत होतो. काही काळ पावसाने दडी मारल्यामुळे आपल्या सर्वांच्या तोंडचे जणू पाणीच पळाले होते. बळीराजा हवालदिल झालेला होता. निसर्गाच्या लहरीपणाला आपण दोष देऊ लागलो होतो. पण निसर्गाच्या लहरीपणाला दोष देणं आम्हाला मात्र पटत नाही. कारण माणसं काय कमी लहरी असतात का? मुळीच नाही. माणसांचा लहरीपणा आणि विक्षिप्तपणा आपण सहन करतोच ना? पण माणसं केवळ विक्षिप्त अन् लहरीच असतात असं नाही तर ती निसर्गाच्या नियमांविरूद्धही वागतात. नैसर्गिक संपत्तीचा अमानुषपणे नाश करतात. अनिर्बंध वृक्षतोड करून, जंगलसंपत्ती नष्ट करून, डोंगरमाथे नि डोंगरउतार ओसाड करून तेथे नव्या बांधकामांच्या रूपात सिमेंटची जंगले उभारण्याचे काम माणसांकडूनच होते ना? या पापकृत्याला आळा घालण्यात आपणच अपुरे पडत आहोत. त्यामुळे पर्यावरणाचा समतोलही बिघडतो आहे. मग पावसाला उशीर झाला म्हणून निसर्गाला दोष देणं कितपत योग्य आहे? पावसाचे ढग अडवावयास आणि पर्जन्यवृष्टी होण्यासाठी साह्यभूत होण्यास डोंगरमाथे नि वृक्षराजी शिल्लक हवी ना? त्यावर माणसाची कुऱ्हाड चालून कसे चालेल? माणसाने प्रथम आपलं वर्तन सुधारावं. आणि मगच निसर्गाच्या लहरीपणाला किंवा अनियमिततेला दोष द्यावा.

अर्थात सृष्टीक्रम किंवा ऋतुचक्र थोड्या फार प्रमाणात बदलले आहे हे खरे असले तरी दरवर्षी पाऊस पडतोच ना? एखाद्या वर्षी तो मुळीच पडला नाही तर सर्वत्र केवढा हाहाकार माजेल! नव्हे, सारी जीवसृष्टीच नष्ट होण्याचं संकट उभे ठाकेल. पण दरवर्षी थोड्या फार फरकाने पावसाचे आगमन न चुकता होते आणि सर्व जीवसृष्टीला नवजीवन प्राप्त होते हे सृष्टीदेवतेचे मानवावरील कधीच न फिटणारे ऋण आहे हेच खरे! शाळेत लहानपणी शिकलेली एक कविता आम्हास आठवते. त्या कवितेत ''नेमेचि येतो बघ पावसाळा । हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा ॥' हे कवीचे उद्‌गार बालमनावर निसर्गाविषयी कौतुकाची नि कृतज्ञतेची भावना जोपासणारे आहेत. कृतज्ञतेची ही वृत्ती, हे संस्कार जपत असतानाच आपण सर्वांनीच प्राणीमात्रांच्या कल्याणार्थ निश्चय केला पाहिजे की आम्ही पर्यावरणाचा समतोल ढळू देणार नाही. वृक्षतोड होऊ देणार नाही. जंगले नष्ट करून व डोंगरमाथे उजाड करून तेथील निसर्गसंपत्तीचा नाश करून नव्या बांधकामांच्या रूपात सिमेंटची जंगले उभारणार नाही. वृक्षसंवर्धनाच्या चळवळीला सक्रिय सहकार्य करू. या संदर्भातील सर्व कायद्याचं काटेकोरपणे पालन करू. यावर आपलं सर्वांचं कल्याणच नव्हे तर प्रत्यक्ष अस्तित्वदेखील अवलंबून आहे. माणसांनी परस्परांना साथ द्यावी, निसर्गाला साथ द्यावी, निसर्गनियमांचे पालन करावे; मगच निसर्गही आपल्याला साथ देईल. दरवर्षी उद्‌भवणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटातून सुटका व्हावी म्हणून शासकीय पातळीवरूनदेखील पावसाचं पाणी अडवून त्याचा पुरेसा साठा होण्यासाठी विविध उपाययोजनांना गती मिळावयास हवी. सारी धरित्री, सृष्टी सुजलाम्-सुफलाम् होण्यासाठी आपणही निसर्गाला साथ देऊया. 'निसर्गनिर्मित भूदेवीचे नंदनवन' होण्यासाठी, 'गडद निळे-गडद निळे जलद (ढग) भरून येण्या'साठी, सर्व नद्या-नाले 'खेळत खिदळत गुणगंभीराकडे (सागराकडे) जाताहेत' हे दृश्य साकार झालेले पाहण्यासाठी, धरित्रीवर 'हरिततृणांच्या मखमालीचे हिरवे-हिरवे गार गालिचे' पसरलेले आहेत हे नेत्रसुखद दृश्य अनुभवण्यासाठी आपण सर्वजण वरूणराजाचे हर्षोल्हासपूर्वक स्वागत करूया.


- क्रांतिसेन रामचंद्र आठवले
भ्रमणध्वनी - ९८६९९४१६९१

ITEM NO.34 COURT NO.3 SECTION X

# S U P R E M E C O U R T O F I N D I A

## RECORD OF PROCEEDINGS

## WRIT PETITION (CIVIL) NO. 184 OF 2011

FEDERATION OF SBI PENSIONERS ASS.& ORS. Petitioner(s)

VERSUS

UNION OF INDIA & ORS. Respondent(s)

(With office report)

Date: 05/07/2012 This Petition was called on for hearing today.

CORAM :

HON'BLE MR. JUSTICE D.K. JAIN
HON'BLE MR. JUSTICE MADAN B. LOKUR

For Petitioner(s) Mr. K.K. Venugopal, Sr. Adv.
Ms. Pooja Dhar, Adv.
Mr. E.C. Vidya Sagar, Adv.

For Respondent(s) Mr. Mohan Parasaran, ASG
Mr. Sanjay Kapur, Adv.
Mr. Anmol Chandan, Adv.
Ms. Ashmi Mohan, Adv.

Mr. Mohan Parasaran, ASG
Mr. Ashok Bhan, Sr. Adv.
Mr. D.R. Chidananda, Adv.
Mr. B. Krishna Prasad, Adv.

UPON hearing counsel the Court made the following

O R D E R

List for final disposal on a non-miscellaneous day
in the month of August, 2012.

(VINOD LAKHINA) (KUSUM GULATI)
Court Master Court Master

****************************************

**It is now learnt from the web-site of Supreme Court that the Next Date of Listing is 8th August 2012**

**S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle) Pune**
**PANAJI ZONAL SUB-CENTRE**
**Proceedings of the 14th Annual General Meeting dt. 15th April 2012**

The 14th Annual General Meeting of the Panaji Zonal Sub-centre covering Goa, Sindhudurg and Ratnagiri Districts was held at Staff Learning Centre, Panaji on 15th April 2012. Around 180 members including Associate members and Family Pensioner members attended the meeting. The dignitaries who attended the Annual General Meeting included Shri.D.V.S.S.Prasad, Dy.G.M.; Shri.M.Y.Dessai, AGM, SLC, Panaji; Shri.M.M.Sirdeshmukh, Jt. Secretary of the Circle Association; and Shri.C.P.Kulkarni, Secretary of Pune ZSC.

Shri.P.M.Narkar, President of the Panaji ZSC extended a warm welcome to the dignitaries, special invitees and all the members present in the meeting. Shri.D.V.S.S.Prasad, Dy.GM, who was the chief guest, inaugurated the meeting by lighting the traditional lamp along with the other dignitaries. Then two minutes silence was observed to condole the death of the following members who passed away during the year and whose names were reported after last AGM. The names of the deceased members are : (1) PM/9356 Mr.Francisco Menezes - 8th February 2012; and (2) PM/6637 Mr.Govind U.Shinkre - 12th March 2012.

Shri.P.M.Narkar, President, in his opening speech, requested the Bank authorities that the Bank should start special counters at large branches for 'senior citizens' so that they could finish their Bank work as early as possible. He indicated that present working staff is ignorant about instructions given in e-circulars pertaining to the pensioners issued by the Bank from time to time. With the result, the pensioners are deprived of the facilities given to them by the Bank. Such e-circulars are always printed in monthly magazine 'Samvad' published by the Pensioners' Association and sent to all the members every month.

In his speech Shri.D.V.S.S.Prasad, Dy.G.M. expressed satisfaction regarding excellent arrangements made for conduct of the proceedings of the meeting, especially he praised the compering qualities of Mrs. Elsa Santos (Vernenkar), who is also a pensioner. He expressed his satisfaction for being in Goa among its people and we, the working staff, should follow the examples set by the pensioners during their service time which are worth emulating. He further said that Bank's pensioners are roving ambassadors of the Bank. After retirement they have ample time to meet Bank's known customers and canvass for the Bank's products. Customers' faith and trust in them will definitely make wonders for the Bank. He expressed that none of the pensioners should feel neglected and disrespected. While making reference to special counters at large branches he pointed out that 'shortage of staff' is always a problem which the existing pensioners must have also faced during their service period. However, he assured that, given the circumstances, they will do their best. While concluding he wished the Bank's pensioners all the best.

As Dr.A.A.Bandodkar, Bank's senior Medical Officer, could not make it to attend the AGM, his "Best wishes to the AGM" message was read out.

Thereafter, Guest speaker Dr. Madhav G. Desai, Chief of Navjeevan Global Heart Centre gave an informative lecture about 'Heart Disease' which was listened by the audience with rapt attention. Dr. Desai is well known for revival and repairs of hearts & body without any surgery and exponent of theory -"Live Naturally without Medicines". Dr.Desai gave information about functioning of the heart, its problems, diseases and treatment. The heart disease is diagnosed at an early age now-a-days which is not a good sign. The food, the air and all the commodities are adulterated. It is due to use of chemicals everywhere our life-style has also changed. Two types of risk factors involved are (i) Modifiable risk factors such as lifestyle, vices and food habits & (ii) Non-modifiable risk factors like blood pressure, diabetes, genetic and congenital defects etc. Doctors also should treat the patients medically without any commercial angle. He should advise the patient other alternative therapies before taking a decision about surgery. By hearing the words Angiography, Angioplasty and By-pass, the patient gets shock. Dr.Desai shared his experience towards 'Advanced Allopathic Medical Chelation (AAMC). He told the audience about valuable steps to overcome heart disease i.e. 'REDD' (means

R- Right Lifestyle; E - Exercise; D - Diet; and D - Drugs). The allopathic treatment removes heavy metals in the body, removes excess deposits of inert calcium and cholesterol. Dr.Desai also gave advice on diet guidelines to heart patients and daily disciplines.

While concluding the Bank's Pensioners' Meet Shri.V.D.Kulkarni, Vice-President of Panaji ZSC expressed gratitude and conveyed thanks to Shri.D.V.S.S. Prasad, Dy.GM and other Bank's functionaries from Z.O. and local branches for their presence and gracing the occasion as also thanked Dr.Desai for his educative and informative lecture.

After tea break the usual Agenda items were taken up. The minutes of the last Annual General Meeting were approved unanimously. Shri.Sudhakar Achyut Kulkarni who completed his 75 years of age was felicitated by offering him a shawl, a bouquet and sweets at the hands of President Shri.P.M.Narkar.

Shri.Dias, Secretary of Panaji ZSC presented Annual Report of the Zonal Sub-Centre. He told that so far the ZSC has enrolled 31 new members during the year. He highlighted the usefulness of the monthly meetings being held at Margaon, Panaji and occasionally at Ponda, Ratnagiri & Kudal. The ZSC collected donations worth Rs.49,466/- (for 'Samvad' - Rs.4,500/- and for Legal Fund - Rs.44,966/-) during the year. While reporting on welfare activities, he referred to the Association's Holiday Home established at Panaji on 28th March 2010. Since March 2010 till date Rs.96,050/- were collected as 'staying charges' from the visiting members. All were happy to stay and see for themselves the amenities provided thereat which can be seen from the 'testimonies' recorded by them in a register meant for it. Shri.Dias further told that he along with President Shri.Narkar attended Bank's structured meeting held on 22-10-2011 at Mumbai LHO. He informed the house that Shri.Narkar personally took up the individual cases/grievances of our members referred by us with Mumbai LHO with good success.

In his Presidential address Shri.P.M.Narkar informed the house the latest developments about the various issues pertaining to Bank's pensioners and the position of court cases pending with various High Courts as also about Writ Petition No.184 of 2011 filed in the Supreme Court which is posted for hearing on 2nd July 2012. President also touched upon the unfortunate attempts made by our own members to distort the efforts made by our Federation in pursuing the Supreme Court case. He also told the house that in the next Structured Meeting with the Corporate Centre functionaries, our Federation will pursue the pending issues regarding admission of VRS / Exit-option retirees to the SBIREMB Scheme.

Then Shri.C.P.Kulkarni, Secretary of our Pune ZSC was requested to conduct the Biennial Elections of the office-bearers of the Panaji ZSC for the period 2012-13 & 2013-14. The following office-bearers of the Zonal Sub-Centre were elected unopposed. Shri.P.M.Narkar-President; Shri.V.D.Kulkarni-Vice-President; Shri.I.H.Dias-Secretary and Shri.Gopinathan-Treasurer. The District representatives also were declared elected with other committee members. The list is appended.

In the open forum, Shri.A.R.Borde stated that he is not receiving 'Samvad' magazine and felt that other members also may be facing the same difficulty in getting 'Samvad' every month. When the matter was referred to the members in the audience, no body came forward and said that they are not getting 'Samvad'. Shri.Borde was assured that whenever he did not receive copy of 'Samvad', he may tell the Secretary who will ensure to provide Shri.Borde a copy thereof for the month. Shri.U.N.Sankolli stated that despite his several requests to the PPG Dept at Mumbai LHO, he has not been provided by the PPG Dept an Advice of his family pension with name of his wife incorporated therein. President Shri.Narkar requested Shri.Sankolli to write to the PPG Dept with necessary information about name and date of Birth of his spouse and send the application through his pension-paying branch. He may also give us a copy of his application to persue the matter with LHO.

The meeting was concluded with a Vote of Thanks to all the members who attended the AGM as also to all those who contributed for the success of the Annual General Meeting. The lunch was provided to all after the meeting.

***- I.H.Dias***
Secretary

## PANAJI ZONAL SUB-CENTRE
### List of Executive Committee Members & District-wise Committee Members with their phone numbers

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.P.M.Narkar | President | | 9822104076 |
| Shri.V.D.Kulkarni | Vice-President | | 9423884645 |
| Shri.I.H.Dias | Secretary | | 8698214924 |
| Shri.K.V.Gopinathan | Treasurer | | 9822983960 |

**Committee Members**

**Panaji :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.I.C.Vaiegas | Member | | 9823088273 |
| Shri.Prakash Mashelkar | Member | | 9764315873 |
| Shri.Mohan Parvatkar | Member | | 9422387548 |
| Shri.Vallabh Kharangate | Member | | 9765092032 |
| Shri.F.A.M.Abreo | Member | 2239520 | |

**Margao (Salcete, Mormugao, Quepem, & Canacona Talukar) :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.Suhas Khandeparkar | Member | | 9850318478 |
| Shri.N.H.P.Dessai | Member | 2756378 | |
| Shri.P.D.P.Salgaoncar | Member | | 9423882667 |
| Shri.M.S.Raikar | Member | | 9423323447 |
| Shri.G.V.Kundaikar | Member | | 9423884679 |
| Shri.A.B.Malkarnekar | Member | | 9922562097 |
| Shri.Menino Furtado | Member | | 9850467930 |
| Shri.V.U.Kamat | Member | | 9226219826 |
| Shri.P.K.Raikar | Member | | 9464396462 |

**Ponda :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.S.S.Amonkar | Member | | 9403174612 |
| Shri.R.N.More | Member | 2317951 | |
| Shri.Mukund Kamat | Member | | 9422429987 |

**Mapuca :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.Kumar Priolkar | Member | | 9373659223 |
| Shri.Y.S.Bagli | Member | 2473169 | |
| Shri.R.G.Nayak | Member | 2413644 | |

**Sindhudurg District :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri.Prakash Masurkar | Dist Coordinator (Sawantwadi) | | 9421148845 |
| Shri.Vidyadhar Rane | Member(Malvan) | (02365)252714 | |
| Shri.Arun S.Toraskar | Member(Kankavlali) | | 9421237463 |
| Shri.Chandji J. Rane | Member(Kankavali) | | 9923824200 |
| Shri.Suresh Ghadigaonkar | Coordinator (Deogad,Kankavali & Malvan) | | 9420307560 |
| Shri.Moham J. Samant | Member (Malvan) | | 9421237802 |
| Shri.Vasant Y.Karandikar | Member (Sawantwadi) | | 9763974255 |
| Shri.Arun S. Bagwe | Member (Kudal) | | 9833189056 |

**Ratnagiri District :**

| | | | |
|---|---|---|---|
| Shri. D.D.Marathe | Dist. Coordinator (Ratnagiri) | | 9422141400 |
| Shri.Anand Joshi | Member | | 9403507130 |
| Shri.J.S.Bhosale | Member | | 9421140487 |
| Shri.V.V.Pelapkar | Member | | 9420627696 |
| Shri.A.K.Ponkshe | Member(Chiplun) | | 9423056798 |
| Shri.K.K.Bapat | Member | | 9421134098 |

**Ladies Representative :**

| | | | |
|---|---|---|---|
| Smt. Elsa Santos (Vernenkar) | Ladies.Representative | | 9922910928 |

# S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

## NAGPUR ZONAL SUB-CENTRE

### For Information of the Members from Nagpur Zonal Sub-Centre

### Bank's Medical Benefit Scheme for Pensioners / Family Pensioners

### List of Approved Hospitals

It has been advised by Nagpur ZSC that the following Hospitals have been approved by the Bank for getting medical treatment under the SBIRE Medical Benefit Scheme for its members.

| Sr.No. | Name of the Hospital | Address | Facilities |
|---|---|---|---|
| 1) | Dr.K.G.Deshpande Memorial Centre (0712) 2533777 | 218 North Bazar Road, Gokul Peth, Nagpur - 440010 | Cardiac Ailment only |
| 2) | Orange City Hospital and Research Institute (0712) 2238431 | 19 Pande Layout, Khamla Rd, Nagpur - 440015 | All ailments excluding Cardiac treatment |
| 3) | KRIMS Hospital (0712) 2451188 | 275 Central Bazar Road, Ramdas Peth, Nagpur - 440010 | All ailments excluding Cardiac treatment |
| 4) | Shrikrishna Hrudalaya and Critical Care Centre (0712) 2444434 | Tikekar Road, Congress Nagar Square, Dhantoli, Nagpur - 440012 | All ailments (Multi--Speciality) including Cardiac Treatment |
| 5) | Life Care Hospital (0712) 2766244 | Central Avenue, Telephone Exchange Chowk, Near Jalaram Mandir, Quetta Colony, Nagpur - 440008 | All ailments (Multi-- Speciality) including Cardiac Treatment |
| 6) | Ashwini Kidney & Dialysis Centre (0712) 2448520 | 301/B, Neeti-Gaurav Complex, 21 Central Bazar Road, Ramdas Peth,Nagpur - 440010 | Kidney Diseases including Dialysis |
| 7) | Care Hospital, Nagpur (0712) 3982222 | 3, Farmland,Panchasheel Square Ramdas Peth, Nagpur - 440010 | Diagnostic Centre |
| 8) | Apollo Clinic, Shree Surya Health Care, Nagpur (0712) 2462156 | Hyatt Enclave, Congress Nagar Square,Dhantoli,Nagpur-440012 | Diagnostic Centre |
| 9) | Avanti Institute of Cardiology Pvt. Ltd. | 5, Abhyankar Road, Dhantoli, Nagpur - 440012 | Cardiac Ailments |

**************************************************

# युनिट वार्ता

## दहिसर युनिट :

आपल्या दहिसर युनिटतर्फे २० ऑक्टोबर २०११ रोजी युनिटचा तृतीय वर्धापन दिन तथा युनिटतर्फे संपादित व प्रकाशित होणाऱ्या 'स्नेहबंध' या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा मुरलीधर हॉल, दहिसर (पूर्व) येथे संपन्न झाला.या समारंभासाठी आपल्या सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष माननीय श्री.व्ही.एम.गोखले व फेडरेशनचे सल्लागार माननीय श्री.बाळासाहेब दांडेकर हे आवर्जून उपस्थित होते. तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे दहिसरमधील प्रथितयश उद्योगपती माननीय श्री.सुरेश ऊर्फ भाई ठाकूर हे विशेष अतिथी म्हणून या कार्यक्रमास हजर होते.

ईशस्तवनानंतर सर्व सन्माननीय पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर परमपूज्य गोंदवलेकर महाराजांच्या दिनविशेषाचे प्रवचन वाचन येथील ज्येष्ठ सभासद श्री.प्रभाकर नातू यांनी केले. त्यानंतर युनिट सचिव श्री.हेमंत नाबर यांनी मान्यवरांचे व सर्व सभासदांचे स्वागत करून युनिटच्या गतवर्षातील कार्यक्रमांचा आढावा सादर केला. सभासदांना मानसिक व आध्यात्मिक शांती लाभावी, तसेच त्यांचे शारिरीक आरोग्य चांगले रहावे यासाठी संघटनेतर्फे सामाजिक उपक्रम, योग/प्राणायाम शिबीरे, व्याख्याने, प्रवचने, निसर्ग सहली इत्यादी विविध उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात त्याची माहिती दिली. या कार्यक्रमांतर्गत दहिसर येथील दत्तमंदिरात श्री.राजाराम मनसुख यांची भगवत्गीतेवरील प्रवचने, आदिवासी पाड्यात जाऊन दुर्गम भागातील आदिवसी बांधवांना कौटुंबिक व जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप, तसेच विद्यार्थ्यांना खाऊ व शालोपयोगी वस्तूंचे वाटप अशा गोष्टींचा समावेश असल्याचे ते म्हणाले. हे सामाजिक बांधिलकीचे व्रत असेच चालू ठेवण्यात येईल अशी ग्वाही श्री.नाबर यांनी दिली.

सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले यांनी याप्रसंगी आपल्या भाषणात दहिसर युनिटच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख करून असोसिएशनच्या सातारा येथील गतवर्षीच्या वार्षिक सभेत दहिसरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अस्तित्वाची जाणून करून दिली. यापुढेही असोसिएशनचे कार्यक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सर्कल असोसिएशनला नव्या दमाच्या कार्यकर्त्यांची गरज असून अशावेळी पुरूष कार्यकर्त्यांनी तसेच सौ.अनुया केळुस्कर, सौ.सुहासिनी सावे, सौ.चारुलता सावे इत्यादी महिला कार्यकर्त्यांनी अपेक्स (Apex) स्तरावर सहभाग घ्यावा असे आवाहन करून युनिटच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर सन्माननीय अतिथी श्री.सुरेश ठाकूर यांनी टाळ्यांच्या गजरात 'स्नेहबंध'चे प्रकाशन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, स्वत:ला रिटायर्ड समजू नका. मी स्वत: ७५ वर्षांचा असूनही रोज १६ ते १८ तास काम करून एक इंडस्ट्री चालवतो. संघटनेच्या कार्याची प्रशंसा करून त्यांनी पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

'स्नेहबंध' दिवाळी अंकाच्या संपादिका सौ.अनुया केळुसकर यांनी, अंकाच्या निर्मिती प्रक्रियेत आलेल्या विविध अडचणींवर मात करून कमी वेळात अंक कसा प्रकाशित झाला, याबद्दल माहिती सांगून जर त्यात कांही त्रुटी राहिल्या असल्यास त्याची नैतिक जबाबदारी संपादिका या नात्याने स्विकारत असल्याचे सांगितले व अशा प्रकारच्या त्रुटी राहू नयेत याची दक्षता पुढे घेतली जाईल याबद्दल निवेदन केले. त्याच बरोबर, अंकाच्या निर्मिती प्रक्रियेत हातभार लावणाऱ्या सर्व सभासदांचे त्यांनी आभार मानले. विशेष करून सर्वश्री हरिश्चंद्र पोतदार, प्रकाश प्रभू आणि राजाराम मनसुख यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण मेहनतीचा त्यांनी खास उल्लेख केला.

आपल्या फेडरेशनचे सल्लागार श्री.बाळासाहेब दांडेकर आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, केंद्र सरकारचे धोरण पेन्शनर्सविरोधी असल्याचे आतापर्यंतच्या प्रत्येक लढ्याचेवेळी दिसून आले आहे. तसेच निवृत्तांनी आपल्या न्याय्य मागण्यांसंदर्भात दाखल केलेल्या खटल्याचा निकाल निवृत्तांच्या बाजूने येऊनही संबंधित खंडपीठांकडे व त्यानंतर सुप्रीम कोर्टात अपील करून निर्णय प्रक्रिया १५-२० वर्षे लांबणीवर टाकण्याच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वृत्तीमुळे जवळजवळ सर्वच पेन्शनर्स आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत. शिवाय त्या दरम्यान ७० ते ८० % पेन्शनर्सनी इहलोकीची यात्रा संपविली असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे. म्हणूनच नाईलाजाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे व आपल्या मागण्या न्याय्य असल्याने तेथे आपल्याला न्याय मिळेल याची खात्री असल्याचे त्यांनी सांगितले. श्री.दांडेकर हे स्वत: नेत्रदानामुळे लाभान्वित झालेले असल्याने त्यांनी सर्वांना नेत्रदान, तसेच देहदान करण्याचे कळकळीचे आवाहन केले.

त्यानंतर स्टेट बँकेच्या दहिसर (पूर्व) शाखेच्या शाखाधिकारी श्रीमती लोपीस, तसेच सर्वश्री कुड्ड्याडी, राजिवडेकर इत्यादींची समयोचित भाषणे झाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुहासिनी सावे यांनी अतिशय प्रभावीपणे केले. सर्वश्री सी.एन.वालावलकर, दीपक नवलकर, कुड्ड्याडी, राजिवडेकर, अनिल बिडये, शशिकांत धराधर, सुरेश पावसकर, मुकुंद सराफ, सुरेश कुलकर्णी इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमास शोभा आली. अखेरीस श्री.मनसुख यांनी दिवाळी अंकाच्या सर्व जाहिरातदार, देणगीदार, सभासद तसेच प्रिंटर्स श्री.दीपक जोशी यांचे आभार मानले. त्याचबरोबर सौ.अनुया केळुसकर, सौ.सुहासिनी सावे, सौ.चारुलता सावे, श्रीमती हेमा अँटन आणि सर्वश्री हरिश्चंद्र पोतदार, मणेरीकर, प्रकाश प्रभू, प्रकाश म्हात्रे, सुधीर मिस्त्री, प्रभाकर नातू, कडले, सुदर्शन परब आदी सभासदांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आवर्जून उल्लेख केला. सामूहिक राष्ट्रगीत गायनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

– हेमंत नाबर, सचिव

*************

**अमरावती युनिट :**

अमरावती युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२ जून २०१२ रोजी सायं.५ वाजता स्टेट बँकेच्या अमरावती येथील मुख्य शाखेत श्री.अविनाश निमदेव यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रथम दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर नवीन सभासदांचे स्वागत केल्यावर श्री.ज्ञानप्रकाश खोब्रागडे यांची नागपूर झोनल सब्सेंटरच्या सहचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल सर्वांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. त्यानंतर कोषाध्यक्ष श्री.नरेंद्र चांडक यांनी युनिटचा गतवर्षातील आर्थिक जमाखर्चाचा तपशील सभेपुढे मंजुरीसाठी ठेवल्यावर त्यास सर्वांनी टाळ्या वाजवून मंजुरी दिली. त्यानंतर युनिट सचीव श्री.ज्ञानप्रकाश खोब्रागडे यांनी ते सचिवपदी निवडून आल्यावर त्यांनी गेल्या दोन वर्षातील वेळोवेळी आयोजित केलेल्या सभा, स्नेहसंमेलने, तसेच सभासदांचे प्रश्न सोडविण्याविषयी केलेल्या प्रयत्नांविषयीची सविस्तर माहिती सांगून, यासाठी सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल व बँकेच्या शाखाधिकाऱ्यांचे व सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार मानले. तसेच नागपूर झोनल सब् सेंटरच्या कार्यकारिणीवर सहसचिव म्हणून निवडून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षांसाठीच्या युनिटच्या नवीन पदाधिकाऱ्यांची व कार्यकारिणी सभासदांची निवडण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारिणीची नांवे 'संवाद' च्या जून २०१२ च्या अंकात पान ३० वर छापली आहेत. नवनिर्वाचित सचिव श्री.एम.डब्ल्यू.जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री.चांडक यांनी आभारप्रदर्शन केल्यावर शीतपेयपानाचा कार्यक्रम होऊन सभा समाप्त झाली.

– ज्ञानप्रकाश खोब्रागडे, सचिव

****************

**Congratulations !**

Ch. Dakshesh Sudesh Nimishe, grandson of Shri.S.B.Nimishe, our member from Pune, has been presented with the "*President's Education Award*" in recognition of his *'Outstanding Academic Excellence in 2012'* in the recently concluded academic session.

Ch.Dakshesh is studying in Herndon High School, Virginia State (USA) and passed Std.VI. Heartiest Congratulations Ch. Dakshesh !!

**- Secretary**

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली
राजगुरु टुर्स
जिव्हाळा जपणारी माणसं...

| | |
|---|---|
| काश्मिर - वैष्णोदेवी | 17975/- |
| केरळ बॅकवॉटर्स AC | 15475/- |
| राजस्थान - मेवाड | 17975/- |
| हैद्राबाद - रामोजी - श्रीशैल्य | 10975/- |
| बंगलोर - म्हैसूर - ऊटी | 13975/- |
| सोमनाथ - द्वारका - गिरनार | 10475/- |
| काशी-गया-प्रयाग-अयोध्या | 12975/- |
| राजस्थान - मारवाड | 14975/- |

सिंगापूर-बँकॉक-पटाया-मलेशिया
Special Discount 1000/- to 4000/- p.p.
022-24318082 / 24381026
राजन पाडलोसकर 9322231216
www.rajgurutours.com

मुक्याचे बोल




वसंत करंबेळकर रत्नागिरी
९४२२३८२०३६

# STATE BANK OF INDIA PENSIONERS ASSOCIATION (MUMBAI CIRCLE) PUNE, AURANGABAD ZONAL SUB-CENTRE

Elections for the Office-bearers of Aurangabad Zonal Sub Centre as well as other District Units in the Zone were held on 25--5-2012. The following office bearers have been elected unopposed for 2012-13 and 2013-14. Shri.S.T.Pawar worked as Election officer.

| Sr. No. | Name of the Post | Name of Elected Office Bearer | Mobile No. |
|---|---|---|---|
| 1 | President | Shri. Sahebrao Desai | 9890128396 |
| 2 | Vice-President | Shri. Uday S Narkhede | 9422772019 |
| 3 | Secretary | Shri..Nagesh K Joshi | 9422211492 |
| 4 | Jt. Secretary | Shri. Malhar T. Deshpande | 9423137290 |
| 5 | Treasurer | Shri..Suresh D. Bhole | 9850953866 |
| 6 | Circle M.C.Member | Shri. S.B KULKARNI | 9823132470 |
| | and | Shri. Vasant R Baviskar | 9822478030 |
| **Jalgaon Dist. Unit** | | | |
| 1 | President | Shri. Sahebrao Patil | 9421003432 |
| 2 | Secretary | Shri. Vasant R Baviskar | 9822478030 |
| 3 | Jt. Secretary | Shri. C. B Ambekar | 0257-2237515 |
| 4 | Treasurer | Shri. Ramesh K Patil | 9850222790 |
| | **Amalner Unit** | | |
| 1 | President | Shri. Ravindra R. Joshi | 9689190040 |
| 2 | Secretary | Shri.Suresh R. Sali | 9881429531 |
| 3 | Treasurer | Shri.Govind C. Chitte | 9421512032 |
| | **Dhule Dist. Unit** | | |
| 1 | President | Shri. Somnath P. Dixit | 9422790975 |
| 2 | Secretary | Shri. Kishor T. Karode | 9822196713 |
| 3 | Jt. Secretary | Shri. Ganpat B. Kasar | 02562/273056 |
| 4 | Treasurer | Shri. Sharad K. Shimpi | 9850824253 |
| | **Nandurbar Dist. Unit** | | |
| 1 | President | Shri. M. A. G. Pathan | 9420374440 |
| 2 | Secretary | Shri. S. V. Tilwankar | 9890838404 |
| 3 | Treasurer | Shri. Suresh D. Gavit | 9423206759 |
| | **Nanded and Hingoli Dist .Unit** | | |
| 1 | President | Shri. Ramesh J. Belokar | 9421840745 |
| 2 | Secretary | Shri. Kashinath S. Kamble | 8149096682 |
| 3 | Treasurer | Shri. Mahadeo H. Chakote | 9422996123 |
| | **Latur Dist. Unit** | | |
| 1 | President | Shri. S. B.Suryawanshi | 9527750216 |
| 2 | Secretary | Shri. Arun P. Kulkarni | 9823066231 |
| 3 | Treasurer | Shri. Manohar V. Jamadar | 9420870958 |
| | **Aurangabad and Jalna Dist. Unit** | | |
| 1 | President | Shri. Ramesh K. Sonawane | 9881477948 |
| 2 | Secretary | Shri. Ashok B. Raut | 9823129581 |
| 3 | Jt. Secretary | Shri. Prakash R. Bhandari | 9225303023 |

It has also been decided to form units at remaining districts i.e. Beed, Osmanabad and Parbhani.

***- N K Joshi, Secretary***

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

## पुणे झोनल सब सेंटर

पुणे येथे दिनांक १२ मे २०१२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

पुणे झोनल सब सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १२ मे २०१२ रोजी पुणे येथील निवारा सभागृह, नवी पेठ, पुणे येथे सायंकाळी ५ वाजता संपन्न झाली.

आपल्या सर्कल असोसिएशनचे पदाधिकारी सर्वश्री आर. एन. लळिंगकर-सेक्रेटरी, मधु सरदेशमुख-जॉईंट सेक्रेटरी, डी. अे. कुलकर्णी-ट्रेझरर हे आमंत्रित हजर होते. त्याशिवाय पुणे झोनमधील पदाधिकारी, जिल्हा प्रतिनिधी व सभासद असे एकूण २५० जण उपस्थित होते.

श्री. अशोक पंडीत, जॉईंट सेक्रेटरी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून स्वागत गीत सादर केले.

दीप प्रज्वलनानंतर पुणे युनिटचे सेक्रेटरी श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांनी मान्यवरांचे व सभेस उपस्थित असलेल्या सभासदांचे मन:पूर्वक स्वागत केले व अध्यक्ष श्री. व्ही. एन. कुलकर्णी यांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरू झाले.

श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांनी गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून ते या सभेच्या तारखेपर्यंत जे सभासद दिवंगत झाले आहेत त्यांची नावे वाचली. सर्व सभासदांनी दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. श्रीयुत एन. एस. कुलकर्णी यांनी दिवंगत सभासद कै. देवळालकर व बी. एम. भिडे यांच्या आठवणी सांगून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांनी गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत जो 'संवाद'च्या जुलै २०११ अंकात छापून आला आहे. त्यात काही दुरूस्त्या असल्यास सुचवण्याचे आवाहन केले व त्यानंतर त्या अहवालास मंजूरी देण्याचे आवाहन केले. काहीही दुरूस्त्या सुचवल्या गेल्या नाहीत. सर्व उपस्थित सभासदांनी हात उंचावून व टाळ्या वाजवून अहवालास मंजूरी दिली व अहवाल मंजूर झाला.

त्यानंतर श्री. कुलकर्णी यांनी मागील वर्षातील कामकाजाचा आढावा सादर केला. गतवर्षात एकूण १९६ नवीन सभासद झाले. रूपये ३,४९,०७६/- इतकी रक्कम सभासद फी व देणगी स्वरूपात जमा झाली. पैकी रु. १,२५,८३७/- लिगल फंडासाठी जमा झाले आहेत. पुणे झोनची एकूण सभासद संख्या पेन्शनर्स २६२६ व फॅमिली पेन्शनर्स ४६७ असोसिएटस् मेंबर्स २१४६ अशी एकूण ५२३९ झाली आहेत असे त्यांनी सांगितले. अनेक सभासदांनी आपल्या वैयक्तिक आयुष्यातील चांगल्या घटनांच्या निमित्ताने असोसिएशनच्या डिस्ट्रेस रिलीफ फंड, लीगल फंड, 'संवाद' यासाठी देणग्या दिल्या आहेत. या सर्व सभासदांचे श्री. कुलकर्णी यांनी आभार मानले.

२०११-१२ या वर्षात आपल्या पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, सातारा येथील प्रमुख शाखांमध्ये पेन्शनरांच्या सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना स्थानिक सभासदांची चांगली उपस्थिती होती. त्याचबरोबर या सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांच्या दर आठवड्याला नियमितपणे अनौपचारिक सभा होत असतात व नवीन कार्यक्रमांची आखणी होत असते असे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले व या सर्व सभासदांचे त्यांनी कौतुक केले.

असोसिएशनच्या पुणे येथील लायब्ररीला सप्टेंबर २०१२ मध्ये ९ वर्षे पूर्ण झाली. आपले बरेच सभासद नियमितपणे पुस्तके वाचावयास नेतात. लायब्ररीचे कामकाज पाहणारे आपले सभासद सर्वश्री अशोक वाकचौरे, अरविंद काळे, सुभाष बेलसरे यांचे मन:पूर्वक आभार मानताना श्री. कुलकर्णी यांनी सर्व सभासदांनी लायब्ररीचा लाभ घ्यावा अशी आग्रहाची विनंती केली.

पुणे येथील 'स्नेहमंडळ' स्थानिक सभासदांसाठी मनोरंजनात्मक व उद्‌बोधक कार्यक्रम आयोजित करते. श्री. मधुकर सरदेशमुख, स्नेहमंडळाचे सेक्रेटरी व त्यांना सहकार्य करणारे सर्वश्री अशोक वाकचौरे, अरविंद काळे, गणेश गुर्जर, अविनाश देशपांडे, प्रमोद चाटे या कार्यकर्त्यांचे श्री. कुलकर्णी यांनी आभार मानले.

असेच विविध कार्यक्रम सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी स्थानिक उत्साही कार्यकर्ते नेहमीच करीत असतात. या कार्यक्रमांचे वृत्तांत आपण 'संवाद' मासिकात वेळोवेळी प्रसिद्ध केले आहेत. अशा सर्व उत्साही कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले व मन:पूर्वक आभार मानले.

सर्व सभासदांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त असोसिएशनची शुभेच्छा पत्रे नियमितपणे पाठविली जातात. हे काम श्री. माधव बापट हे गेली ११ वर्षे सातत्याने करत आहेत. सर्व सभासदांना त्यांच्या या कामाबद्दल खूपच कौतुक वाटते. काही सभासद या प्रसंगी असोसिएशनला देणगी पाठविताना पत्रात त्याबद्दल आवर्जून उल्लेख करतात. श्री. कुलकर्णी यांनी श्री. बापट यांचे मन:पूर्वक आभार मानले.

श्री. बापट यांना प्रकृति अस्वास्थ्यामुळे यापुढे ही जबाबदारी पेलणे अवघड होत आहे. त्यामुळे जानेवारी २०१२ पासून आपले सभासद श्रीयुत प्रमोद चाटे यांनी स्वत: पुढे येवून ही जबाबदारी स्वीकारली आहे. त्याबद्दल श्री. कुलकर्णी यांनी श्री. चाटे यांचे कौतुक केले व त्यांना या कामात शुभेच्छा दिल्या. श्री. एन. एस. कुलकर्णी

यांनी श्री. बापट यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले व असोसिएशनने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पास करावा असे सूचित केले. यास सर्व सभासदांनी टाळ्या वाजवून मान्यता दिली.

जिल्ह्यातील सर्व सभासदांना असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत भाग घेता यावा या उद्देशाने गतवर्षीपासून पुणे झोनल सब सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा एक वर्षाआड युनिटच्या सेंटरमध्ये घेण्याचे ठरवले. त्यानुसार अहमदनगर युनिटने गतवर्षीच्या आपल्या झोनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे यजमानपद उत्स्फूर्तपणे स्वीकारले. अहमदनगर येथे दिनांक १ जून २०११ रोजी सदर सभा यशस्वीरित्या पार पडली. श्री. एस. आर. जोशी युनिट सेक्रेटरी यांच्या नेतृत्वाखाली सर्व सभासदांनी उत्तम रितीने योगदान दिले. त्याबद्दल श्री. कुलकर्णी यांनी युनिटच्या सर्व सभासदांचे अभिनंदन केले व पुढील वर्षीच्या सभेसाठी इतर युनिटनी पुढे यावे असे आवाहन केले.

गतवर्षीची सर्कल असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३१ जुलै २०११ रोजी सातारा येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. त्यासाठी सातारा येथील सभासदांनी सर्वश्री सुरेश देशपांडे व दिलीप देशपांडे यांचे नेतृत्वाखाली उत्कृष्ट योगदान दिले. याबद्दल सातारा युनिटच्या सर्व सभासदांचे श्री. कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. गेली काही वर्षे सातत्याने पुणे झोनमधील जिल्हेच सर्कलच्या वार्षिक सभेचे एक वर्षाआडचे यजमान पद यशस्विरीत्या सांभाळत आहे. ही पुणे झोनसाठी अभिमानाची बाब आहे असे श्री. कुलकर्णी म्हणाले.

वैद्यकीय सेवेबद्दल श्री. कुलकर्णी यांनी माहिती दिली की पेन्शनर्स असोसिएशनच्या प्रयत्नांमुळे गेली ४ वर्षे रखडलेली पौड रोड, डिस्पेन्सरीमध्ये नुकतीच सुरू झाली आहे. त्याच प्रमाणे सातारा व नाशिक येथेपण या वर्षी डिस्पेन्सरी सुरू झाल्या आहेत. डेक्कन जिमखाना डिस्पेन्सरी, नवीन डॉक्टरांची नेमणूक करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. अहमदनगर येथील बंद पडलेली डिस्पेन्सरी सुरू करण्यासाठी ते युनिट प्रयत्न करीत आहे. पुणे मोड्युलमध्ये आता पुणे येथे ३ व कोल्हापूर, सातारा, सोलापूर, नाशिक येथे डिस्पेन्सरी सुरू झाल्या आहेत. या बाबतीमध्ये श्री. एन. एस. कुलकर्णी सर्कल असोसिएशनचे माजी अध्यक्ष यांनी दिलेल्या सहकार्याचा श्री. कुलकर्णी यांनी आवर्जून उल्लेख केला व युनिटच्या सभासदांचे कौतुक केले. प्रत्येक युनिटमधील कार्यकर्त्यांनी मेडिकल बेनिफिट स्किम अन्वये हॉस्पिटल मंजूर करून घेण्यासाठी प्रपोजल पाठवावे असे त्यांनी आवाहन केले.

ऑक्टोबर २०११ मध्ये मुंबई लोकल हेड ऑफिस येथे पहिली स्ट्रक्चरल मिटींग आयोजित करण्यात आली होती व त्यात पुणे झोनच्या सर्व बाबींवरती आशादायक चर्चा झाली असेही त्यांनी सांगितले. पुणे झोन येथे नवीन आलेले डीजीएम श्री. वैजीनाथ यांनी पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावले होते व पुणे झोनच्या प्रश्नांवर आशादायक चर्चा झाली. असोसिएशनचे सर्कल पदाधिकारी सर्वश्री व्ही. एम. गोखले, श्री. लळिंगकर, श्री. मधु सरदेशमुख त्याचप्रमाणे सल्लागार श्री. पालकर, खडे ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे. त्यांचे श्री. कुलकर्णी यांनी आभार मानले. आपल्या झोनल ऑफिसमधील डीजीएम, मुख्य प्रबंधक (एचआर) व त्यांचे सहकारी तसेच चीफ मेडिकल ऑफिसर व त्यांचे सहकारी ह्या सर्वांचे त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल कुलकर्णी यांनी आभार मानले.

ह्यानंतर गेल्या वर्षभरात ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली अशा ज्येष्ठ सभासदांचा पुष्पगुच्छ व ५०० रूपयांचा चेक देऊन सर्वश्री मधु सरदेशमुख, लळिंगकर व व्ही. एन. कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एकूण ६६ सत्कारार्थींना सत्काराचे आमंत्रण दिले होते. काही सभासदांनी प्रकृति अस्वास्थामुळे येवू शकणार नाही असे कळवले. सभेत खालील सभासदांचा सत्कार झाला.

सर्वश्री व्ही. डी. कट्यारे, कमलाकर देशपांडे, पीटर मायकेल, गंगाधर हार्डीकर, शरद काणे, ए. जी. भाभे, एस. के. मंडपे, एस. डी. भालेराव, सी. डी. पारखी, अरूण पंडित, व्ही. के. वाळिंबे, सी. एम. पारखी, सुधाकर कुलकर्णी, सुरेश कोरडे, दिनकर मदाने, एस. आर. तुंगतकर, दिनकर जोशी, सी. बी. दुवेदी, भास्कर श्रीधर कुलकर्णी, एस. व्ही. पारनाईक, एम. एस. कुलकर्णी, श्रीमती शशीकला देवधर, नीता वासुदेव हर्डीकर, मंगला पटवर्धन, सुनिता जोगळेकर.

यावेळी काही सत्कारार्थींनी असोसिएशनला देणग्या दिल्या. या वर्षीच्या सत्काराचे एक वैशिष्ट्य असे की, आपले एक सत्कारार्थी श्रीयुत श्रीकृष्ण दंडवते यांनी सर्व सत्कारार्थींना 'गुरूचरित्र दिनदर्शिका' भेट दिली. त्याबद्दल श्रीयुत दंडवते यांचे सर्वांनी आभार मानले. सत्कारानंतर श्रीयुत एस. पी. बर्वे यांनी मंत्रपठण करून सर्वांना दीर्घायुष्य चिंतीले.

यानंतर खालील सभासदांचे त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आले.

'संवाद मासिक' - सर्वश्री प्रभाकर गुपचूप, श्रीधर सहस्रबुद्धे, शरद शिंगवेकर, क्रांतिसेन आठवले,

लायब्ररी - श्री. अशोक वाकचौरे

शुभेच्छा पत्रे - सर्वश्री माधव बापट व प्रमोद चाटे

डिस्पेन्सरीसाठी - श्री. शाम भणगे (नाशिक)

पुणे झोनची वार्षिक सर्वसाधारण सभा (नगर) - श्री. एस. व्ही. जोशी

सर्कलची वार्षिक सर्वसाधारण सभा सातारा व डिस्पेन्सरी (सातारा) - श्री. सुरेश देशपांडे

श्रीयुत बापट प्रकृति अस्वास्थ्यामुळे येवू शकले नाहीत.

सत्कारास श्रीयुत सहस्रबुद्धे यांनी समर्पक उत्तर दिले व सभासदांना 'संवाद' मासिकासाठी साहित्य पाठवण्याचे आवाहन केले.

श्रीयुत एन. एस. कुलकर्णी यांनी श्री. सहस्रबुद्धे यांच्या व्यासंगाचा मागोवा घेतला. नाशिकचे श्रीयुत शाम भणगे यांनी पण सत्कारास उत्तर दिले.

श्रीयुत मधुकर सरदेशमुख (सेक्रेटरी स्नेह मंडळ) यांनी सांगितले की, वारंवार विनंती करूनही सभासद प्रतिसाद देत नाहीत. म्हणून यापुढे मंडळाचे सांस्कृतिक काम बंद करणे भाग पडत आहे.

यानंतर श्रीयुत लळिंगकर जनरल सेक्रेटरी मुंबई सर्कल यांनी असोसिएशनच्या सद्य स्थितीचा आढावा घेतला व सुप्रीम कोर्टात असलेल्या केसबद्दल निवेदन केले.

सर्व सभासदांनी आपल्या शाखेत जाऊन फॅमिली पेन्शन ॲडव्हाइस घ्यावा, व काही त्रुटी असतील तर ब्रॅच मॅनेजरला तसे लेखी देवून पीपीजी डिपार्टमेंटला देण्यास सांगावे, आपल्या घरातील पेन्शनसंबंधी सर्व कागदपत्र पत्नीला व इतरांना दाखवून ठेवावीत म्हणजे ऐनवेळी काही अडचणी येणार नाहीत, लाईफ सर्टिफिकेट व पॅन नंबर ब्रँचला वेळेत द्यावा असे त्यांनी सर्वांना आवाहन केले. सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांनी शंका निरसन केले.

यानंतर श्री. डी. ए. कुलकर्णी सर्कल ट्रेझरर यांनी त्या दिवशी देणगी दिलेल्या सभासदांची नावे वाचून दाखवली व एकूण देणग्या रूपये २६०००/- जमा झाल्याचे सांगितले.

त्यानंतर श्रीयुत एस. जी. रबडे यांनी सन २०१२-१४ या वर्षासाठीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकांबद्दल निवेदन केले व बिनविरोध निवडून आलेल्या सभासदांची नावे सादर केली.

सभेनंतर सह्याद्री हॉस्पिटल येथील डॉ. लिखिते यांचे सांध्याचे विकार व त्यावरील उपचार यावर उपयुक्त व मार्गदर्शनपर दृकश्राव्य सादरीकरण झाले. त्यांनी सभासदांच्या शंकांचे निरसन केले. हे सादरीकरण सर्व सभासदांना खूपच उपयुक्त होते असे अनेकांनी बोलून दाखवले.

शेवटी श्री. अशोक पंडीत यांनी सर्वांचे आभार मानले व सभेची सांगता झाली.

यावेळेस सभासदांसाठी अल्पोपहार व चहापानाचे आयोजन केले होते.

**- चंद्रकांत कुलकर्णी,**
सेक्रेटरी, पुणे झोनल सब सेंटर

### स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

## ❊ पुणे झोनल सब सेंटर ❊

सन २०१२-१४ या वर्षासाठी खालील कार्यकर्त्यांची मॅनेजींग कमिटीवर बिनविरोध निवड झाली.

| पद | नाव | फोन नंबर |
|---|---|---|
| झोनल प्रेसिडेंट | श्री. एल. जी. गांधी | ९८८१७५९२९० |
| झोनल व्हाइस प्रेसिडेंट | श्री. व्ही. एन. कुलकर्णी | ९३७७०५८५६७ |
| झोनल सेक्रेटरी | श्री. चंद्रकात कुलकर्णी | ९८५०९१६४०६ |
| झोनल जॉईंट सेक्रेटरी | श्री. अशोक पंडित | ९४२२३१६१४६ |
| झोनल ट्रेझरर | श्री. जी. एन. जोशी | ९८६०७७०६४५ |
| कमिटी मेंबर्स - | श्री. प्रमोद चाटे | ९८२३९३८४८६ |
| | श्री. अविनाश देशपांडे | ९६६५९५४०८८ |
| | श्री. अनिल खाडीलकर | ९८५०९८४०४५ |
| | श्री. मधुकर लेले | ९८८१०१७७३३ |
| | श्री. सुधीर पुरंदरे | ९७६४०८१६६६ |
| | श्री. पी. बी. कुलकर्णी | ९८२२४०६६९२ |

जिल्हा युनिटचे निर्वाचीत सेक्रेटरी हे कमिटीचे पदसिद्ध सभासद आहेत.

**- चंद्रकांत कुलकर्णी,**
सेक्रेटरी, पुणे झोनल सब सेंटर

# संवाद लेख स्पर्धा २०१२

## पुरुष विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख

# मी जोपासलेले छंद

छंद म्हणजे आवड, इंग्रजी ज्याला हॉबी म्हणतो. प्रत्येक व्यक्तीची आवड वेगळी असते. कुणाला वाचनाची, कुणाला खेळाची, कुणाला गिर्यारोहणाची, कुणाला पोष्टाची तिकिटे, चित्रे, पुस्तके, नाणी, मूर्ती जमविण्याची आवड असते तर कुणाला सुतारकाम, बागकाम, समाजकार्य करणेही आवडेल.

छंद म्हणजे एखाद्याच्या मूळ उद्योगधंद्याहून किंवा नोकरीहून निराळी असलेली परंतु सदैव आनंद देणारी, जिच्यामुळे मौज वाटणारी, मनोरंजन करणारी, अल्पस्वल्प प्रमाणात लाभदायक ठरणारी आणि रिकाम्या वेळात करता येण्यासारखी कृती.

मी तूळ राशीचा माणूस असल्यामुळे जे जे सुंदर ते ते बघुनिया मज वेड लागे अशी माझी स्थिती. माझे तसे बरेच छंद आहेत. दुर्मिळ पुस्तके, प्राचीन/अर्वाचीन भारतीय नाणी, विविध व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या, साहित्यिकांची हस्ताक्षरे, काड्यापेट्या, विविध प्रकारच्या, आकाराच्या विदेश निर्मित सेंटच्या बाटल्या आणि विविध छापाच्या छोट्या-मोठ्या दारूच्या बाटल्याही. या मुख्य गोष्टी मी येथे नमूद केल्या, पण माझ्याकडे पोष्टाचे भारतीय स्टॅम्प आहेत, पोष्टाची मेघदूत कार्डे अन्य प्रसंगविशेष कार्डे आहेत. पोष्टाचीच प्रथम आवरण लिफाफे/पाकिटे आहेत आणि काही मूर्त्याही आहेत.

मी सुरुवात केली ती पुस्तके जमविण्यापासून. खरंतर माझे शालेय आणि माध्यमिक शिक्षण झाले, रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील सध्या अणुउर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने सर्वांमुखी झालेल्या जैतापूर या गावी. गाव अगदी छोटं, शाळा देखील छोटीच, त्यामुळे वाचनालय छोटं. ग्रामपंचायत असलेलं गाव. तेथे मला पुस्तकांचे कपाटही कधी दिसलं नाही, त्यामुळे वाचनाची आवड त्या ठिकाणी होऊ शकली नाही. पुढे महाविद्यालयीन शिक्षण आणि नोकरीसाठी मुंबईत आलो असताना देखील अभ्यासक्रमातील कादंबऱ्या आणि वेचे, कवितांच्या पलीकडे वाचन जाऊ शकले नाही. आश्चर्य वाटेल पण प्रथम वर्षाला लावलेली हरिभाऊ आपटेंची 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी चांगली रेक्झिन बाइंडिंग केलेली मी लगेचच विकून टाकली. माझे मराठीचे प्राध्यापक होते विख्यात लेखक अनंत काणेकर आणि कवी/समीक्षक, एम.ए.ला सुवर्ण पदक प्राप्त रमेश तेंडुलकर. असे असताना देखील मी इतर वाचनाच्या बाबतीत इंटरमिजिएटपर्यंत कोरडाच राहिलो.

मला पुस्तकांची आवड निर्माण झाली ती मी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या 'साहित्य प्राज्ञ' या परीक्षेस बसलो त्यावेळी शिकवणारी मंडळी उत्तम होतीच पण परीक्षेला लावलेली पुस्तकेही प्रभावित करणारी होती. त्यात डॉ. केतकर 'व्यक्ती वाङ्मय' हे पुस्तक होते. काव्य वाहिनीत विविधकवी होते आणि वा.गो.मायदेव संपादित सावरकरांच्या कविता हे पुस्तक होते. या परीक्षेच्या निमित्ताने विकत घेतलेली पुस्तके अजूनही माझ्या संग्रहात आहेत.

पुस्तके म्हणजे पृथ्वीवरील अद्ययावत ज्ञानाचे प्रचंड भांडार. युगायुगातील विचारवंतांच्या ज्ञानाचा, कार्याचा, शहाणपणाचा आणि त्यांच्या शिकवणुकीचा संग्रह आणि सार. पुस्तकांच्या साहाय्याने आपणास भूतकाळात डोकावता येते, भविष्यकाळात भराऱ्या मारता येतात आणि वर्तमान काळातील सत्य पडताळून पाहता येते. थोरामोठ्यांना न भेटताही पुस्तकांच्या साहाय्याने आपल्याला त्यांच्या सहवासात वावरता येते. इतकेच नव्हे तर पुस्तकांच्या साहाय्याने आपण सारी पृथ्वी पालथी घालू शकतो. पुस्तके म्हणजे आपल्याला अज्ञात असलेल्या जगाचे दर्शन घडविणारा विशाल आरसा.

मी ज्या वेळेला पुस्तके जमवायला लागलो त्यावेळेला पुस्तकांसंबंधीचे हे भव्य-दिव्य, प्रेरक विचार माझ्यासमोर नव्हते. आपल्या मराठीत फार मोठे लेखक होते, आहेत. साहित्यसम्राट न. चि. केळकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, शि.म.परांजपे, प्रा.श्री.म.माटे, आचार्य अत्रे, वि.स.खांडेकर, प्रा.ना.सी.फडके, माधव ज्यूलियन, साने गुरूजी आणि विनोबाही. यांना प्रत्यक्ष भेटू शकलो नाही, ऐकू शकलो नाही तरी त्यांच्या साहित्यकृतीतून त्यांना भेटू शकतो, समजावून घेऊ शकतो. यातूनच मी ह्या सगळ्या आणि नामोल्लेख न केलेल्या अनेकांची पुस्तके अनेक माध्यमांद्वारे प्रसंगी अव्वाच्या सव्वा पैसे देऊन गोळा करू लागलो. विशेषत: कोश वाङ्मय अर्थात माहितीपर पुस्तके/ग्रंथ हा माझा आवडता विषय. विविध प्रकारचे कोश माझ्याकडे आहेत. डॉ. केतकरांचा ज्ञानकोश (२३ खंड) तर माझ्याकडे आहेतच, पण व्यायाम ज्ञानकोश (मुझुमदार)-१० खंड, सुलभ ज्ञानकोश-६ खंड, तत्त्वज्ञान कोश, ग्राम कोश, फार्सी-मराठी शब्दकोश, शब्द रत्नाकर, म्हणी-वाक्प्रचारांचा द्विखंडीय-कर्वे-दाते कोश, सात खंडीय महाराष्ट्र शब्दकोश इ. याशिवाय मराठी, ब्रिटीश, मुसलमान, रियासती, आचार्य अत्रे-सुमारे ९० पुस्तके, संपूर्ण लोकमान्य टिळक, ना.गो.चापेकरांचे चित्पावन, बदलापूर-माझा गाव, साष्टीची बखर, महिकावतीची बखर, सरखेल भांगे-ढबू,

विश्वकोश, संस्कृती कोश, संकेत कोश, गणेश कोश, राम कोश, प्राचीन महाराष्ट्र, अर्वाचीन महाराष्ट्र-डॉ.कोतकर. माझ्याकडे १०० वर्षांपूर्वीचीही काही पुस्तके आहेत. कथा, कादंबऱ्यांच्या बाबतीत फक्त ज्यांना अभिजातता प्राप्त होऊ शकते, उदा. ययाती, व्यक्ती आणि वल्ली, युगांत, महाभारत-एक सूडाचा प्रवास, मृत्यूंजय, नटसम्राट, वाग्वैजयंती इ. प्रामाणिकपणे सांगतो इथे घेतलेली नोंद नगण्य आहे.

माझ्याकडे सुमारे अडीच ते तीन हजार ग्रंथ सहज असतील. एक निवासस्थानच त्यांच्यासाठी आहे. आता एवढी पुस्तके आहेत, त्यातील मी किती वाचली? एक मात्र नक्की कि प्रत्येक पुस्तक मी चाळलेलं असते. मात्र या पुस्तकांचा उपयोग मी अभ्यासकांसाठी अवश्य करीत असतो.एक दोनच उदाहरणे देतो. सुमारे १९८७-८८ ला डॉ. आंबेडकरांचे रिडल्स इन हिंदुइझम हा ग्रंथ शासनाने प्रकाशित केला. काही कारणांमुळे अल्पावधीतच त्यावर बंदी आणली गेली आणि ती उठवण्यासाठी प्रा.नलिनी पंडित यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद आयोजित केला होता. प्रा. शंकर वैद्य त्यातील एक वक्ते. ते सहज मला भेटले आणि म्हणाले, ''मला ते पुस्तक हवे आहे. सध्या उपलब्ध नाही.'' मी म्हटले, ''सर, मी ते तुम्हाला देतो'' आणि दिलेही. कारण ते पुस्तक माझ्या संग्रहात होते. त्या परिसंवादातील कुणीही ते पुस्तक वाचणे तर सोडूच पण पाहिलेलेही नव्हते. दुसरे पुस्तक म्हणजे 'शोककारण आणि शोकांतिका'-ले. माधव आळतेकर. एका प्राध्यापक बाईंना ते दुर्मिळ पुस्तक हवे होते. त्या पुस्तक विक्रेत्यांकडे गेल्यावर पुस्तक विक्रेत्यांनी सांगितले, ''अतिशय दुर्मिळ पुस्तक, शिरवाडकरांना भेटा' आणि खरेच ते पुस्तक मी त्यांना देऊ शकलो. माझ्या संग्रहाचा मी अनेक संशोधकांना, अभ्यासकांना लाभ देत आलेलो आहे. त्यामुळेच अनेक प्रबंधात, ग्रंथात माझ्या साहाय्याचा उल्लेख केलेला दिसतो. मुंबई विद्यापीठाने यामुळेच माझा 'बहि:शाल व्याख्याता' म्हणून गौरव केला आहे.

माझा दुसरा मौल्यवान छंद म्हणजे जुनी भारतीय नाणी जमविणे. खरं तर या छेदाला बादशाही छंद मानले जाते. नाणी तशी किल्ल्यांच्या किंवा जुन्या राजवाड्यांच्या आसपास फिरून मिळत नाहीत. पुरातत्त्व खात्याच्या उत्खननात किंवा जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणीच्या वेळी नाण्यांचे काही साठे सापडतातही, पण असे क्वचित घडते. मात्र एवढे खरे कि काही श्रीमंत व्यक्ती, संस्थानिक, राजे इत्यादींच्या घरी निश्चितपणे सोन्या/चांदीच्या नाण्यांचा संग्रह मालमत्तेच्या स्वरूपात असतो. सराफांकडे/सोनारांकडे नाणी सापडतात आणि तेथूनच ती व्यापारांकडे जातात आणि मग घसघशीत पैसे देऊन आम्हा संग्रहांकडे येतात. नाणी मानवी जीवनाची/इतिहासाची साक्षीदार मानली जातात. नाण्यांवर त्या त्या सम्राटाचे राज्य वर्ष असते, त्यावेळचे वर्ष चिन्हांकित केलेले असते. त्यांच्या काही खूणाही असतात. त्यांना सिम्बॉल म्हटले जाते. नाण्यांनी इतिहासकार/कथाकार म्हणून भूमिका वठवावी या हेतूने मुद्राशास्त्राचा जन्म झाला आणि अलिकडे इतिहासाच्या विद्यार्थ्यांना त्याचा अभ्यासही करावा लागतो.

नाणी अनेक राजांची, संस्कृतीची आपल्याला पाहावयास मिळतात. उदा. आहत नाणी, विदेशी राजांची नाणी, इंडो, ग्रीक, पोर्तुगीज, फ्रेंच, डच इ. कुषाण, सातवाहन, गण जनपद, क्षत्रप, गुप्त सम्राट, चालुक्य, हूण, गुर्जर, पांडेय, विजयनगर, शिवाजी, पेशवे, मुघल, ब्रिटीश आणि आता स्वतंत्र भारताची नाणी आता संग्राहकांना सगळ्या प्रकारची नाणी जमवणे शक्य होत नाही. म्हणून मी देखील मराठा म्हणजे पेशवा, इंदूर,देवास, धार, बडोदा, ग्वाल्हेर, बहावलपूर, त्रावणकोर, नवानगर, सौराष्ट्र, जंजिरा, म्हैसूर, जावरा, अवध, मौल्वार, कच्छ, बिकानेर, जयपूर, उदयपूर, ओर्चा, शिख, काश्मीर इ. संस्थानिकांची तसेच ब्रिटीश इंडिया, पोर्तुगीज इंडिया म्हणजे गोवा शिवाय मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतांची नाणी जमवतो. भारतात स्वातंत्र्यापूर्वी सुमारे ३०० संस्थानिकांना नाणे पाडण्याची परवानगी ब्रिटीश सरकारने दिली होती. याठिकाणी जागे अभावी मी फक्त काहींचा उल्लेख केला असला तरी अनेक नाणी, अत्यंत चांगल्या स्थितीतील सोने, चांदी, तांबे, शिसे इ. अशी सुमारे अडीच हजार नाणी माझ्या संग्रहात आहेत. राजे, त्यांची कारकीर्द तारखा इ. ची नोंद उत्तम प्रकारे ठेवून मी त्यांचा संग्रह केलेला आहे. मी वृत्तीने अभ्यासू असल्यामुळे नाण्यांच्या छोट्या-मोठ्या फरकांसाठीही नाण्यांचा संग्रह केलेला आहे. आपल्याला कल्पना येणार नाही पण बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर, कच्छ इ. संस्थाने नाणे निर्मितीच्या विविधतेमुळे श्रीमंत होती. बडोद्याच्या नाण्यांवर प्रामुख्याने तलवार म्हणजे पराक्रमाची खूण, इंदूर-पिंडी, बेलाचे पान, नंदी, ग्वाल्हेर-सर्प, तोफा इ.च्या खुणा आढळतात. त्यावर विविध मिंटची नावेही नोंदलेली असतात. या सगळ्यांची सोन्याचीही नाणी होती, चांदी रूपये, आठ आणे, चार आणे, दोन आणे स्वरूपात होती आणि एक पैसे, दोन पैसे, पया यांसाठी तांब्याचा उपयोग केला जात असे.

स्वतंत्र भारताची नाणी देखील अलिकडे वर्षवार जमा करण्याचा छंद जोपासला जातोय. त्यातही मजा असते. मिंटप्रमाणे म्हणजे मुंबई, कोलकाता, हैदराबाद, नॉयडा आणि (एवढ्या मिंट भारतात नाणी पाडतात) इ. नाणी मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. भारत सरकार थोरा-मोठ्यांच्या स्मरणार्थ प्रसंगविशेष रू. १००/-, रू. ५०/-, रू. १०, रू. ५/- अशी

नाणी मागणीनुसार काढत असते. अर्थातच दर्शनी मूल्यापेक्षा निर्मिती मूल्याप्रमाणे सरकार त्यांचे पैसे आकारते. अलिकडे रू. १००/- आणि रू. ५/- च्या नाण्यासाठी सरकार रू. ३५००/- आकारते. यातील रू. १००/- या नाण्यात ५०% चांदी असते आणि बाकी तांबे आणि निकेल, झिंक असते. भारतरत्न कामराज, शास्त्री, वल्लभभाई पटेल, लुई ब्रेल, लोकमान्य टिळक, बसवेश्वर, इंडियन एअर फोर्स, चित्तरंजन दास, भारतीय रिजर्व बँक, सुभाषचंद्र, पं. नेहरू, इंदिरा गांधी असे अनेक ७० सेट निघालेले आहेत आणि त्यातील ३/४ सेट वगळता मी ते जमविले आहेत. शिवाजी महाराज तसेच संभाजी, शाहू महाराजांच्या शिवराया म्हणजे एक पैसा तांब्याचा माझ्या संग्रहात आहेत. टिपू सुलतान, विजयनगर, वाडियार, त्रिपुरा अशी अनेकांची नाणी मी शास्त्रीय पद्धतीत जमविली आहेत आणि या नाण्यांचे वर्गीकरण या विषयांवरील पुस्तकांच्या आधारे केलेले आहे. ही नाणी केवळ स्वत:कडे न ठेवता, मित्रांच्या सहकार्याने रसिक/इतिहास प्रेमींच्या अवलोकार्थ मी त्यांचे दरवर्षी प्रदर्शन आयोजित करत असतो. नाण्यांबरोबर विविध माहितीचे तख्तेही प्रेक्षकांसमोर ठेवतो.

मी वाङ्मयाचा, मराठी साहित्याचा विद्यार्थी होतो आणि चांगला साहित्यिक कार्यकर्ताही आहे. ललित या वाङ्मयीन मासिकात मी 'मुक्काम पोस्ट' हे वाङ्मयीन कार्यक्रमाची माहिती देणारे सदरही दीर्घकाळ लिहित होतो. या अनुषंगाने माझा साहित्यकांशी पत्रव्यवहार होत असे आणि त्यातूनच साहित्यिकांची हस्ताक्षराची पत्रे मी गोळा करायला सुरूवात केली. यातील सगळीच मी जमविली असे नव्हे मी मित्रांकडूनही मिळवली. सुमारे १००/१२५ पत्रे माझ्या संग्रहात आहेत. नमुन्यादाखल काहींचा उल्लेख करतो. ना. सी. फडके, शांता शेळके, मंगेश पाडगावकर, प्रभाकर पाध्ये, वि.वा.शिरवाडकर, य.दि.फडके, शंकर वैद्य, सरोजिनी वैद्य, माधव मनोहर, विश्राम बेडेकर, मालती बेडेकर, मधु मंगेश, शिरीष पै, पु.ल.देशपांडे, जयवंत दळवी, डॉ. राची ढेरे, अरूणा ढेरे, वसंत सबनीस, द.ग.गोडसे, वंदना विटणकर, श्री. रा.टिकेकर, अरविंद ताटके, वि.स.पागे. अनुराधा पोतदार, सुभाष भेंडे, सुरेश भट, दि.ब.देवधर, भारतरत्न पा.वा.काणे, सुहास शिरवळकर इ. या पत्रांतून पत्रलेखकांचे स्वभाव कळतात, शैली लक्षात येते, विचार करण्याची पद्धती लक्षात येते आणि आपण त्यातून प्रेरणा घेऊन आपले व्यक्तिमत्व विकसित करू शकतो.

अनेकांच्या स्वाक्षऱ्याही मी जमविल्या आहेत. सुरुवात माझ्या मुलाने केली आणि मी ती पुढे वाढवली. माझ्याकडे क्रिकेटर, नट, नट्या, साहित्यिक, पुढारी, विचारवंत अश्यांच्या सह्या आहेत. बाळ ठाकरे यांची स्वाक्षरी तर एका ८/१० जणांच्या खाजगी कार्यक्रमात घेतली, त्या कार्यक्रमात मीही सहभागी होतो. अटल बिहारी वाजपेईंची स्वाक्षरी मी मिळवली. अरविंद देशपांडे, काशिनाथ घाणेकर, सुलोचना, वंदना गुप्ते, सीमा, रमेश देव, कृष्णकांत दळवी, बाळ धुरी, अरूण जोगळेकर, दिलीप प्रभावळकर, शाहीर साबळे, रेखा इ. नट नट्यांच्या सह्या आहेत. आशा भोसले, पी. सावळाराम, विद्याधर गोखले, शं.ना.नवरे, गोविंद तळवलकर, श्रीकांत मोघे, सुधीर मोघे, व.पु.काळे, व्यंकटेश माडगूळकर, अरूण साधू, कुसुमाग्रज, अमिताभ आणि जया बच्चन यांच्या स्वाक्षऱ्या फोटोसह मिळविल्या आहेत. क्रिकेटरमध्ये नरेंद्र ताम्हाणे, अजित वाडेकर पार्थसारथी शर्मा, पॉली उम्रीगर, विजय मांजरेकर, सुभाष गुप्ते, सलीम दुराणी, एकनाथ सोलकर, दिलीप वेंगसरकर, जयंतीलाल, सुनील गावसकर, ब्रिजेश पटेल, हनुमंत सिंह. यातील बऱ्याचशा स्वाक्षऱ्या मला हनुमंत सिंहानी गावस्करची बहिण कविता हिच्या गुंडाप्पा विश्वनाथ बरोबर लग्नाच्या वेळेला मिळवून दिल्या. त्यावेळी हनुमंत सिंह दादर शाखेत माझे विभागीय व्यवस्थापक होते.

पोष्टाची तिकिटे जमविणारे खूप आहेत. हा छंद शेवट नसलेला आहे. त्यामुळे ६ मे १९४० पासून तिकिटे निघताहेतच. मी विशेषत्वाने तिकिटे जमवत नाही पण काही नक्कीच जमविलेली आहेत. त्यात काही राष्ट्रीय नेते, फळे, फुले, खेळ इत्यादींचा समावेश आहे. पण प्रथम दिवस आवरण (फर्स्ट कव्हर) माझ्याकडे बरीच आहेत. पोस्ट खात्यातर्फे नवे खास तिकिट प्रचारात आले की तिकिटाच्या वितरणाच्या दिवशी ही आवरणे प्रचारात येतात. साध्या पाकिटासारखेच पाकिट असते. पोष्टाचा शिक्का संपूर्ण तिकिटावर उमटवत नाहीत. पोष्टाचे तिकिट कुणाच्या मदतीने/संस्थेचे प्रतिक म्हणून काढले आहे त्याचा उल्लेख आणि ज्या कचेरीतून विक्रीस निघते तिचे नाव व प्रसिद्ध दिनांक त्या आवरणावर असतो. आवरणाच्या डाव्या बाजूला तिकिटाची रेखाकृती किंवा त्या व्यक्तीची जीवनसार सांगणारी त्या व्यक्तीची उक्ती छापलेली असते. संपूर्ण पाकिटाची सजावट सुरेख व डौलदार असते. ते पाहताना डोळ्याला फारच सुख होते. ह्या कल्पनेला इंग्रजीत कॅचेटस म्हणतात. याबरोबरच पोस्ट खाते फोल्डरही वितरणात ठेवते. त्यात त्या व्यक्तीची किंवा संस्थेची माहिती असते. तिकिट शताब्दी (१.१०.१९५४), लोकमान्य टिळक (२३.७.१९५६), विवेकानंद मानवी हक्क, डॉ. राधाकृष्णन, जमशेटजी टाटा इ. अनेक प्रथम दिन आवरणे माझ्या संग्रहात आहेत. तिकिटे आणि आवरणे यातून आपल्यास इतिहास, भूगोल, राजकारण, संस्कृती इ. चा माहिती सहजपणे मिळते.

विविध आकारांच्या सेंटच्या बाटल्या सुमारे २० माझ्याकडे आहेत. त्या सगळ्या 'एव्हॉन'च्या म्हणजे परदेशातल्या आहेत.

एका आकाराची मग तो पक्षी, फळ, प्राणी, बोट, घंटा, फूल काहीही असेल पण ती एकदाच काढली जाते. आकार चांगला, बनावट उत्तम व आकर्षकताही यांची वैशिष्ट्ये. मी परिश्रमपूर्वक चोरबाजारात जाऊन प्रसंगी रिकाम्या बाटल्यांना देखील उत्तम पैसे देऊन या बाटल्या मिळविल्या आहेत. यात गाड्या आहेत, घड्याळे आहेत, टेलिफोन आहे, बंदुका-पिस्तुले आहेत, मोटारी आहेत, आयफेल टॉवर, व्हिक्टोरिया राणी, अंबारी, हत्ती, घोडे सगळे सगळे आहे. हे सगळे पाहताना मजा येते, आनंद वाटतो. दारूच्या पेग बाटल्या तसेच मोठ्या बाटल्याही मी जमवून त्या अर्थात दोन्हीही प्रेक्षणीय स्थितीत ठेवल्या आहेत.

सुमारे १५०० काड्यापेट्या भरलेल्या माझ्याकडे आहेत. वेगळा गंध, वेगळे आकार, पेटीवर वेगवेगळी चित्रे हे यांचे वैशिष्ट्य. शेक्सपिअरच्या जन्मगावची म्हणजे स्टॅटफोर्ड एव्हानच्या शेक्स्पीअरचे घर, थडगे, वाचनालय इ. त्यांच्यावर चित्ररूपाने दाखवलेले आहे. या पेट्या मला सुप्रसिद्ध क्रिकेट आकडेतज्ज्ञ श्री. सुधीर वैद्य यांनी जाणीवपूर्वक आणून दिल्या. तशा त्यांनी श्रीलंकेतूनही काड्यापेट्या माझ्यासाठी मुद्दामहून आणल्या. या सर्व एकत्रित पाहणे आनंद देऊन जातात.

मी आता माझ्या शेवटच्या छंदाचा उल्लेख करतो. मी पोष्टकार्ड जमविली आहेत. त्यावर जाहिराती असतात. उदा. एस-मॅक्स, दर शाम ५ बजे देखील दुसरे संदेश देते - हम दो, हमारे दो. मेघदूत कार्ड ही नवीन कल्पना. २५ पैशांच्या या कार्डावर पत्त्याच्या बाजूला जाहिरात असते. मजकूर फक्त एका बाजूलाच लिहिता येतो. ही रंगीत असून, जाहिराती रंगीत असतात. अनेक भाषात या जाहिराती असतात. जाहिराती कल्पक व आकर्षक असतात. ही कार्डेही माझ्याकडे २५० आहेत. शासनाने याची निर्मिती आता बंद केल्याचे कळते.

शेवटी छंदांवर जे आक्षेप घेतले जातात आणि त्यांच्यापासून लाभ काय होतो ते पाहू. छंद निरूपयोगी, रिकामटेकड्यांचा उद्योग, वेळ, पैसे उगीचच खर्च होतात, घरात लक्ष नसते, मुलांकडे दुर्लक्ष होते. हे मान्य करूनही छंदांमुळे अनेक चांगल्या गोष्टी घडतात. आळस, निराशा, दुर्मुखलेपणा जातो. निराधार वाटत नाही, मनाला शांती व शिस्त लागते. विध्वंसक प्रवृत्ती नाहीशी होते. पुरुषार्थ जागा होतो आणि असा माणूस मोठे सामाजिक कार्य करू शकतो, ज्ञानात भर घालतात, दु:खावर फुंकर घालतात. मानसिक, शारीरिक श्रम दूर करतात आणि छंद प्रसंगी दामदुपटीने पैसे मिळवून देतात.

मात्र छंदाच्या आहारी जाणे धोक्याचे त्याला काबूत ठेवून आपल्या गरजेप्रमाणे उपयोग करून कल्याणांचे छंदाचे वेड होऊ नये.

**- पद्माकर धोंडो शिरवाडकर**, ठाणे
भ्रमणध्वनी - ९९६९६३३५८८,

# संस्कृत दिनानिमित्ताने !

आपल्या संघटनेचे सदस्य श्री. सुधाकर गोखले नाशिक यांच्या सुविद्य पत्नी सौ. गोखले यांचे एक पुस्तक 'सप्त कलाकृती कालिदासांच्या' माझ्या वाचनात अलिकडेच आले.

या पुस्तकाच्या लेखिका या M.A. M.ed, Ph.D. आहेत. गेली २२ वर्षे नाशिकला H.P.T. संस्कृतच्या प्राध्यापक असून त्यांनी अनेक शोधनिबंध लिहिले असून दासबोधाचा आणि समर्थ संप्रदाय यावर त्यांचा विशेष अभ्यास असून तो ग्रंथरूपाने उपलब्ध आहे.

कालिदास हा महाकवी होता हे सर्वांना अगदी शाळेत असल्यापासून ठाऊक असते. संस्कृत विषयात गोडी असेल त्याप्रमाणे आपण पुढे वाचन करतोसुद्धा पण ज्यांना संस्कृत भाषा येत नाही पण कालिदास जाणून घ्यावयाची इच्छा आहे अशा जिज्ञासू वाचकांची सोय व्हावी म्हणून सौ. साधनाताईंनी हे छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. मेघदूत, रघुवंश, कुमारसंभव आणि ऋतुसंहार ही चार काव्ये आणि मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि अविज्ञान शाकुंतल ही तीन नाटके अशा सात कलाकृतींचा अतिशय सुबोधपणे परिचय करून दिला आहे. कथानकाबरोबर कालिदासाचा साहित्य गुणांचा सोदाहरण उहापोह केला आहे. 'उपमा कालिदासस्य' असे का म्हणतात त्याचा अंशत: अनुभव वाचकांना निश्चित येईल आणि मुळातून या कलाकृती वाचण्याचा मोह होईल. लेखिकेला एवढी पावती पुरेशी आहे.

शाकुंतला नाटक वाचून जर्मन कवी गटे हर्षभरित झाला. आणि आपण मात्र एतद्देशीय असूनही अशा कलाकृतीपासून वंचित राहतो, त्याची कारणे मग काहीही असोत. याला काय म्हणावे! 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' असल्यामुळे कोणाला भवभूती वा भारवी किंवा माघ हे कवी आवडतील हेही खरे. काही असो, आपला जो सांस्कृतिक वारसा आहे त्याची निदान ओळख तरी करून घेऊ या. एवढेच या नारळी पौर्णिमेच्या राष्ट्रीय संस्कृत दिनानिमित्ताने सांगणे -

**- श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**
भ्रमणध्वनी - ९८२३२८५३९०

## अभिनंदनीय

डोंबिवली (पूर्व) येथील सभासद सौ. मंगला मराठे यांचे पती श्री. शरद मराठे हे वयाच्या ६३ व्या वर्षी ए.सी.सी.ए. लंडनतर्फे घेण्यात आलेली Diploma in International Financial Reporting Standards ही परीक्षा फेब्रु. २०१२ मध्ये उत्तीर्ण झाले. हा एक जागतिक विक्रम आहे. ते सध्या कॉस्ट अकौंटंट म्हणून व्यवसाय करतात.

श्री. मराठे यांचे सुयशाबद्दल हार्दिक अभिनंदन !

- सेक्रेटरी

# संवाद लेख स्पर्धा २०१२

## स्त्री विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख

# मागे वळून बघताना

(सुखी आणि समाधानी निवृत्तीनंतरचे जीवन-माझे अनुभव)

'मग आपण भेटतोय...'' एवढं बोलून मी रिसिव्हर खाली ठेवला. जवळच उभ्या असलेल्या माझ्या आईने विचारलं, ''कुणाशी बोलत होतीस गं?'' मी अगदी सहज सांगितलं, 'शरद पोंक्षे.' आई बघतच राहिली. मी मनाशीच हसले आणि तिला म्हटलं, ''अगं शरद पोंक्ष्यांचं काय घेऊन बसलीस, तुझ्या या लेकीने गेल्या काही वर्षात, 'डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. भारती आमटे, पानीपतकार विश्वास पाटील, सिंधुताई सकपाळ, डॉ. नरेंद्र जाधव, माजी पोलिस महासंचालक अरविंद इनामदार, रमेश देव, सीमा, प्रवीण दवणे... अशा दिग्गजांशी कोणाच्याही मध्यस्थीशिवाय थेट संवाद साधलाय. या नामवंतांचे सेल नंबरही माझ्यापाशी सेव्ह केलेले आहेत, एवढंच नव्हे तर त्यांनी पाठविलेली शाबासकीची पत्रेही माझ्याजवळचा सर्वात मूल्यवान असा दागिना आहे..'

खरंच, बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन बाहेर पडलेल्या माझ्यासारख्या एका 'सामान्य स्त्री'ला हे सारं शक्य झालं ते केवळ आमच्या आचार्य अत्रे कट्ट्यामुळे. दोन ध्रुवांमधील हे अंतर 'कट्ट्याच्या शिडीमुळे' एकदम जवळ आलं.

हा प्रवास असा झाला... २००१ साली जेव्हा बँकेत व्ही.आर.एस. वाजतगाजत आली तेव्हा पन्नाशीच्या तळ्यातमळ्यात असलेल्या आमच्या ग्रुपने, पोटापाण्यासाठी शेवटपर्यंत कुणापुढे हात पसरावे लागणार नाहीत एवढी तजवीज बँकेने केलीय हे पाहून धडाधड फॉर्म भरले. पण शेवटचा दिवस (३१ मार्च २००१) जसा जवळ येऊ लागला तसा एकच प्रश्न छळू लागला, 'रिकाम्या वेळाचं करायचं काय? त्याच सुमारास पेपरात 'पार्ल्याच्या अत्रे कट्ट्याविषयी' आलेली बातमी माझी मैत्रिणी 'विदुला ठसे' हिने वाचली आणि मला दाखवली. आम्ही दोघींनी ठरवलं की, हे आपल्याला करण्यासारखं आहे. त्यानंतर मात्र आम्ही पटापटा हातपाय हलवले. पार्ल्याला जाऊन आलो, सगळं समजून घेतलं आणि ११ एप्रिल २००१ या दिवशी 'स्वर्गीय आनंद दिघेसाहेबां'चे शुभाशीर्वाद घेऊन ठाण्यातील भास्कर कॉलनीतील जिजाऊ उद्यानात आमचा अत्रे कट्टा सुरू देखील झाला.

शनिवार रविवार इकडे तिकडे जाण्यासाठी मोकळा राहावा म्हणून कट्ट्याचा वापर 'बुधवार' ठरला. वेळ सं. ६ ते ७॥. यातील पहिला अर्धा तास जमलेल्या कट्टेकऱ्यांसाठी व नंतरचा १ तास आमंत्रितांसाठी. कट्टा सुरू झाला खरा पण प्रश्नांचं गाठोडं डोक्यावर होतं... लोक येतील ना... थोरामोठ्यांच्या मानधनासाठी पैसे कुठून आणायचे... मुळात महिन्याला ४ याप्रमाणे वर्षाचे ५० वक्ते कुठे शोधायचे.. झालंस तर माईकची व्यवस्था... सार्वजनिक बागेत कार्यक्रमासाठी परवानगी... कार्यकर्त्यांची जमवाजमव इ. प्रश्नांना हळूहळू उत्तरं मिळत गेली आणि ४-५ वर्षातच आमचा कट्टा 'धट्टाकट्टा' झाला. अर्थात आमच्या पाठी विदुलाचे यजमान विलास ठुसे, स्थानिक आमदार, नगरसेवक तसेच ठाण्यातील काही प्रतिष्ठित मंडळी भक्कम उभी राहिली म्हणूनच एवढा पल्ला आम्हाला गाठता आला. आपली बँक तर 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश...' या धर्तीवर आम्हाला आधार देत आलीय.

पूर्वी 'गर्दुल्यांची बाग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'जिजाऊ गार्डन' मध्ये आता सहित्याचा सुगंध दरवळतो. जवळजवळ सगळी वृत्तपत्रं आपले वार्ताहार कट्ट्यावर नियमितपणे पाठवतात. ५ वर्षापूर्वी ठाणे महानगरपालिकेने आमच्या या कर्मभूमीवर १०० कट्टेकरी बसतील असे कट्टे व प्रशस्त दगडी व्यासपीठ बांधून दिल्याने या उपक्रमावर जणू राजमान्यतेची मोहोरच उमटलीय.

कट्ट्याच्या अनेक उपक्रमांपैकी वानगीदाखल केवळ दोनच सांगते - २६ जुलैच्या तुफानी पावसामुळे सखल जागी असलेल्या आमच्या हॉलमध्ये (पावसाळ्यात कट्टा भरतो ती जागा) चिखलाचा नुसता राडा झाला होता. पण दुसऱ्या दिवशी सर्व कार्यकर्त्यांनी स्वावलंबनाने परिस्थिती 'जैसे थे' केली आणि जवळच्या झोपडपट्टीतील १० कुटुंबे, ज्यांची या हाहाकारात दैना उडाली अशांना कट्ट्यावर बोलावून 'स्टेट बँक नौपाडा'च्या माध्यमातून मदतीचा हात देण्यात आला. त्यांच्या दुर्दैवी कहाण्या ऐकताना उपस्थित कट्टेकरी हेलावले. आणखी एक न विसरता येणारा उपक्रम म्हणजे २००९ च्या महिला दिनाला आयोजिलेले 'कष्टकरी स्त्रियांसाठी एक दिवसाचं माहेर' धुणं-भांडी व स्वयंपाकपाणी करणाऱ्या ३५ बायकांच्या मेळाव्यात-खेळ, गाणी, गप्पा, वैद्यकीय मार्गदर्शन याबरोबर हातात गरमागरम पावभाजीची प्लेट आणि जाताना माहेरची भेट अशा आदरातिथ्याने प्रत्येकीचे डोळे ओलावले.

मला हे पक्क ठाऊक आहे की, 'हे काही एकट्या दुकट्याचे काम नाही. जीव ओतून, निरपेक्षपणे काम करणारे १५-२० कार्यकर्ते हा कट्ट्याचा बँक-बॅलन्स. आम्हा कार्यकर्त्यांचा ग्रुप हे आता एक 'जिव्हाळ्याचं बेट' बनलंय. केवळ सुखाच्या क्षणी सोबत करणारं नव्हे तर दु:खाच्या प्रसंगी आधारासाठी खांदा देणारं....

माझ्यावर आकस्मितपणे ओढवलेल्या डोंगराएवढ्या दु:खातून सावरायला या कट्ट्यानेच हात दिला. आयुष्यातले ते काळे दिवस आठवताना आजही मन बधिर होतं... व्हीआरएस नंतर दिवस 'फुलपाखराचे पंख' लावून उडत होते आणि अचानक या फुलपाखराचे पंखच काटले गेले. २००४ चा ऑगस्ट महिना होता तो. माझ्या पोलादी नवऱ्याला ध्यानीमनी नसताना

'किडनी कॅन्सरचं' निदान झालं आणि माझं आयुष्यच बदलून गेलं. त्यानंतर पुढची दोन वर्ष आशा-निराशेचा खेळ सुरू होता. पण दान उलटं पडलं. त्या दोन वर्षातच दोन्ही मुलांची लग्नं झाली. मुलाला पुण्यात नोकरी मिळाल्याने त्याने पत्नीसह तिकडे बिऱ्हाड थाटलं, तर मुलगी माहिमला गेली. अशा परिस्थितीतून मला बाहेर काढण्याचंच नव्हे तर जीवनाला पुन्हा नव्यानं भिडण्याचं बळ दिलं ते माझ्या कट्ट्याने, माझ्या लेखनाच्या छंदाने आणि दूर असूनही सदैव माझ्या सोबत असणाऱ्या माझ्या लेकीने....

मी लिहिती झाले त्या पाठीही एक कथा आहे.... व्हीआरएस नंतरचा पहिला दिवस माझ्या अगदी अंगावर आला होता. घरातली सगळीच आपापल्या कामाला पुटूपुटू निघून गेली आणि मग पुढ्यातली लांबलचक दुपार सरता सरेना. मग वेळ घालवण्यासाठी म्हणून हातात कागद पेन घेतले आणि त्या दिवसाची 'सुनीसुनी' कहाणीच कागदावर उतरवली. शीर्षक दिलं, 'स्वेच्छानिवृत्ती नंतरचा पहिला दिवस' आणि सहज म्हणून पाठवून दिलं लोकसत्ताकडे आणि काय आश्चर्य, शनिवारच्या चतुरंग पुरवणीत तो लेख लगोलग छापूनही आला. त्या दिवशी मला साक्षात्कार झाला की, 'आपण बऱ्यापैकी लिहू शकतो.' त्यानंतर 'गाता गळा, शिंपिता मळा, लिहिता लेखनकला...'' या उक्तीप्रमाणे माझ्या लेखनाला पैलू पडत गेले आणि गेल्या १०/११ वर्षात माझे जवळजवळ २५० लेख लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स (म.टा.) सकाळ अशा दर्जेदार वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले. एवढंच नव्हे तर लोकसत्ताच्या 'वास्तूरंग' पुरवणीमध्ये व म.टा.च्या रविवारच्या 'संवाद' पुरवणीत वर्षभर सदर लेखनाची संधी मिळाली आणि लेखिका ही नवी ओळख माझ्या नावामागे अलगद येऊन बसली. माझ्या लेखणीने दिलेला सर्वोच्च आनंद म्हणजे माळशेज घाटातील एका दुर्गम भागातील आदिवासी शाळेविषयी लिहिलेला लेख वाचून एका दानशूर व्यक्तीने त्या शाळेला पाठविलेली १० हजाराची मदत. लेखनाचा आणखी एक फायदा म्हणजे ते वाचून 'मुंबई आकाशवाणीमधून' वनिता मंडळ, ऐसी अक्षरे... अशा कार्यक्रमांसाठी बोलावणी येऊ लागली आणि एक नवं अवकाश खुलं झालं. म.टा.मधील लिखाणामुळे अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा 'म.टा.सन्मान' पुरस्कारासाठी जज्ज म्हणून (टि.व्ही. मालिकांसाठी) काम करण्याची संधी मिळाली.

लहान मुलांमध्ये रमणं, स्वतःला जे किडुक मिडुक येतं ते त्यांना शिकवणं या गोष्टीची मला पहिल्यापासूनच प्रचंड आवड. यासाठी सोसायटीतील मुलांना एकत्र करून दोन वर्ष संस्कारवर्ग चालवले. त्याच ओढीतून राजीव तांबे यांच्या गंमत शाळेविषयीच्या शिबिरात नाव नोंदवलं आणि तिथे भेटलेल्या समविचारी मैत्रिणींसमवेत ठाण्यात २ वर्ष 'गंमतशाळा' चालवली. 'मूलामध्ये मूल' होण्याचा हा अनुभव खूप काही शिकवून गेला. या गंमतगोष्टीही वृत्तपत्रातून वाचकांपर्यंत पोहचवल्या.

कट्ट्यावरील मुख्य वक्ता येण्यास उशीर झाल्यास तो येईपर्यंत जमलेल्या कट्टेकऱ्यांना चांगलं काही तरी ऐकवून 'खिंड लढवत राहणं' या गरजेतून प्रसिद्ध कवींच्या उत्तमोत्तम कविता व चांगले उतारे यांचा संग्रह करून हे साहित्य मुखोद्‌गत करण्याची सवय लागली. या आवडीतून स्वतःचा एक तासाचा कार्यक्रम करण्याची प्रेरणा मिळाली आणि बघता बघता माझ्या स्वतंत्र कार्यक्रमांनी 'द्विशतकाचा' टप्पाही पार केला.

माझ्या या अल्पशा धडपडीचं जरा जास्तच कौतुक झालं आणि नवदुर्गा पुरस्कार, वसुंधरा पुरस्कार असे मानसन्मान चालत आले. कट्ट्याच्या दशकपूर्ती निमित्ताने गेल्या वर्षी दूरदर्शनवर रात्री ९॥ च्या बातम्यात 'विशेष पाहुणी' म्हणून आमंत्रित केलं. आशा राजदेरकर लिखित 'गाथा गुणवंतांची' या पुस्तकात 'ठाण्यातील २१ गुणवंतांमध्ये' समावेश झाला.

आज मागे वळून बघताना, मनात एक 'हळवा' कोपरा असूनही मी तृप्त आहे. कारण एका छोट्याशा, सुंदर कवितेने मला खूप काही शिकवलंय....

एकदा आयुष्य विणायला घेतलं<br>
तलम, रेशमी, मुलायम, सुखावणारे<br>
रंगीबेरंगी फुलपाखरांसारखे आनंदी, सुखद<br>
धागे गुंफले खरे, पण समाधान नाही झालं<br>
मग आठवले ते दुःखाचे धागे<br>
एका कोपऱ्यात दिनवाणे बसलेले<br>
त्यातले चार धागे घेतले<br>
आणि परत विणू लागले<br>
बघता बघता एक सुंदर वस्त्र तयार झालं<br>
दुःखाचे आणि सुखाचे धागे एकमेकांना बिलगून बसले<br>
नि एक सुरेख वस्त्र आकाराला आलं.

- **संपदा वागळे,** ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०६८७५१२

## अभिनंदनीय

आपले पुणे येथील सभासद श्री. विनायक गणेश मुळे यांची स्नुषा सौ. अंजली राहुल मुळे ही अमेरिकेतील मिनिसोटा विश्वविद्यालयाची (Family Medicine) परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण झाली.

सौ. अंजली यांच्या सुयशाबद्दल हार्दिक अभिनंदन!

– सेक्रेटरी

# अशी ही एक काळरात्र

मी परळी वैजनाथ (मराठवाडा) शाखेत शाखाधिकारी होतो. त्यानंतर माझी बदली नागपूर झोनल ऑफिसला झाली होती. काही दिवसांनी मला लगेचच रिजर्व बँक ऑफ इंडियाकडे ७-८ महिन्यांसाठी (डेप्यूटेशन) वर जावे लागेले. आपल्याच शाखांचे काम होते. (ट्रॅन्सपोर्ट ऑपरेटर्स) व (स्मॉल बिझीनेस फायनान्स) अकाउंटस्‌चा सर्वे करायचे व नंतर प्रत्येक शाखेचा अहवाल रिजर्व बँकेला पाठवायचा असे काम होते. त्यासाठी मला विदर्भातील धामणगाव, बाभुळगाव व वरूड अशा तीन शाखा व मराठवाड्यातील सेलू व शिरूर (अनंतपाल) अशा दोन शाखा देण्यात आल्या होत्या. त्यात शिरूर (अनंतपाल) ही शाखा शेवटची होती.

गाव लहान असल्यामुळे मी रोज लातूर इथून ये जा करत होतो. साधारणत: रोज सकाळी ९ वाजता बस असायची. ती शिरूरला ११ वाजता पोचत असे. येताना संध्याकाळी ७ च्या सुमारास बस होती. सकाळी ८ वाजता फक्त नाश्ता करून निघत असे. गाव लहान असल्यामुळे तिथे चहा व चिवडा (तिखट) शिवाय काही मिळत नसे. लातूरला रात्री आल्यानंतर जेवत असे. त्या शाखेचे काम जवळ जवळ १५ ते २१ दिवस चालले. एप्रिल महिन्याच्या ११ तारखेला संपले. मी काम आटोपल्यानंतर रोजच्या प्रमाणे संध्याकाळी ७ ची बस पकडली. बसमध्ये रोजच्या प्रमाणे गर्दी होती. साधारणत: २-३ कि.मीटरवर बस आल्यानंतर वळीवाचा पाऊस चालू झाला. तशात ड्रायव्हरचा गाडीवरचा ताबा सुटला व बस रस्ता सोडून शेतामध्ये घुसली व तिरप्या स्थितीत उभी राहिली. बस रस्त्यावर आणायचा ड्रायव्हरने खूप प्रयत्न केला पण बस काही हलायला तयार नव्हती. जवळपास राहणारे लोक पटकन खाली उतरले व आपापल्या घरी निघून गेले. बसमध्ये मी एकटा व एक ग्रामीण जोडपे तेवढेच होतो. बसमध्ये लाईट चालू ठेवण्याची कंडक्टरला विनंती केली व ती त्यांनी मान्य केली.

नंतर पावसाचा जोर वाढला. पाऊस रात्रभर कोसळत होता. बाहेर खूप काळोखा होता. त्यात रात्रभर रातकिड्यांचा आवाज, कोल्हेकुई देखील ऐकू येत होती. बसच्या खाली उतरायची सोय नव्हती. कारण एकतर पाऊस व त्यात भर म्हणजे खाली खूप चिखल व सापांची पण भीती होती. रात्रभर तिरप्या स्थितीतील बसमध्ये बसून होतो. झोपेचा पत्ता नव्हता. रात्रभर ना पाणी ना जेवण ना काही. शेवटची शाखा म्हणून प्रवासासाठी थोडेफार पैसे देखील शाखेतून काढले होते. त्यामुळे चोरांचे देखील भय वाटत होते.

सकाळी ड्रायव्हर कंडक्टर आले. येताना गावातील लोक ट्रॅक्टर घेऊन आले होते. खूप खटपट केल्यानंतर सकाळी १० च्या सुमारास बस रस्त्यावर आली व अस्मादिक साधारणत: साडे अकरा वाजता लातूरला सुखरूप पोहोचलो व सुटकेचा नि:श्वास सोडला व देवाचे मनोमन आभार मानले.

- **अरविंद कुलकर्णी**, नागपूर
भ्रमणध्वनी - ९७६३८४५६६४

## विडंबन कविता

*(उठा उठा चिऊताई या सुप्रसिद्ध कवितेचे केलेले विडंबन काव्य - कै. कुसुमाग्रजांची क्षमा मागून)*

झोपा झोपा चिऊताई
झोपा झोपा चिऊताई
सारीकडे अंधारले
इवलेसे डोळे तुझे
का ग नाही मिटलेले ।।१।।

द्विपाद हे दूत आले
मोडावया तुझे घर
मिटून घेई नेत्र तुझे
अश्रूंचा जरी वाहे पूर ।।२।।

पक्षीगणांचा विहार, गोड गोड गाणी
सारे गेले हरवोनी
कॉंक्रीटच्या या जंगलात आता
बेसूर आणि भेसूर गाणी ।।३।।

निद्रिस्तच राहा, बाळ आणि चिमणी
देतील हो चारापाणी
माणसाच्या जातीतले
पक्षीमित्र कोणी कोणी ।।४।।

नको आता दूर जाणे
पक्षीमित्र नेतील त्या
अभयवनी विहरणे ।।५।।

- **चंद्रशेखर निरंतर**, पुणे
दूरध्वनी - ०२०-२४२८२१३१

ता.क.अभयवन - पक्षी अभयारण्य
(BIRD SANCTUARY)

# आमच्या सौभाग्यवतींचे 'इंटरनेट' शाप की वरदान?

'बोलता बोलता' आमच्या विवाहाला आता 'जवळ जवळ' पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. हेच माझे वाक्य मी प्रथम 'बोलता बोलता' ऐवजी बोलणी 'खाता खाता' असे होते. परंतु नुकतेच फॅमिली पेन्शन रिव्हाईजड् झाल्यापासून आमचे येथील हवामान वेध शाळेपेक्षा निराळे दिसते. दुसरे म्हणजे मिसेस हल्ली संवाद मासिक न विसरता वाचतात आणि शंका कुशंका पण विचारतात. आता फॅमिली पेन्शन ॲडव्हाईसमध्ये बेनिफिशरीचे नावासमोर त्यांचे नाव नाही ही हेड ऑफिसची चूक आहे. यामागे माझा काही वाईट हेतू नाही. दुसरे म्हणजे 'जवळ जवळ' हे शब्द जवळ असले तरी विरह धरून पन्नास वर्षे अशी सुधारणा पाहिजे. वरचेवर माहेरी जाणे- तीन बाळंतपणे - लेकी सुनांचे बाळंतपणासाठी परदेश दौरे याची गणना केली तर पन्नास हा आकडा चुकीचा आहे. पूर्वी एका लेखा अहवालात सरकारी नोकर हा वर्षाकाठी फक्त दहाच दिवस काम करतो याचा हिशोब दिला होता. कारण पन्नास रविवार अधिक वीस पंचवीस सरकारी सुट्ट्या - बारा पंधरा किरकोळ किंवा प्रासंगिक दांड्या - एक महिना हक्काची- दोन आठवडे आजारपणाची - अधून मधून संप हरताळ बंद निदर्शने - डेप्युटेशन- प्रशिक्षण- कधी प्रिंटर बंद तर कधी कनेक्टीव्हिटी नाही - वगैरे वगैरे. तेव्हा विवाहाला पंचवीस वर्षे झाली असेच वाटते. आता विवाहाला पन्नास वर्षे म्हणजे ओघाने सौभाग्यवतींची अमृत महोत्सवात गणती आणि आम्ही सहस्र चंद्रदर्शनासाठी टेरेसवर उभे. हे सर्व कार्यक्रम एकाच मंडपात साजरे करण्यासाठी विभक्त कुटुंबातील घटकांच्या गुप्त बैठका चालू असल्याचे कानावर आले होते. यामध्ये लेकी आणि जावयांचा उत्साह ओसंडून वाहत होता तर मुले आणि सुना बैठकीला उशिरा तरी येत हाते किंवा बैठक चालू असताना अर्जंट मेसेज मोबाईलवर आला आहे म्हणून बैठक सोडून उठून जात होते. या सर्व घोळात मंडळींना काय भेट द्यावी ह्या विचारात गेले दोन तीन आठवडे मला शांत झोप नव्हती. कपड्यांचा सेल लागला असेल तेथे जाऊन चांगला शालू किंवा पैठणी घ्यावी म्हटले तर हल्ली सौ. ला पंजाबी ड्रेस व ओढणी घेण्याचे डोहाळे लागलेले होते. सराफाचे पेढीवर जाऊन चांगला दागिना घ्यावा म्हणून विचार केला पण भुरट्या चोरांमुळे तो विचार डळमळीत होता. दुसरे म्हणजे तेल-तुपात- दुधात भेसळ ठीक पण खुद्द सोन्याचांदीत सुद्धा भेसळ-सुजलाम सुफलाम देवांच्या पण चोऱ्या होतात. गृहपयोगी वस्तू घ्यावी तर आमचे वन रूम किचन म्हणजे नुसता मॉल आहे मॉल. काय टाकावे आणि काय ठेवावे हे समजत नाही. राजा केळकर संग्रहालय. वाचनाचा छंद वाढावा म्हणून सवलतीच्या दरातील आठ-दहा पुस्तके आणावीत- तर साठी शांतीला मिळालेले रामायण महाभारताच्या खंडावरील रंगीबेरंगी वेष्टणे पण काढलेली नव्हती- सरतेशेवटी चालू फॅशनप्रमाणे एक कोरा करकरीत फोर 'जी' मोबाईल आणि इंटरनेटचे कनेक्शन घेऊन देण्याचा विचार केला आणि शांत झोपी गेलो.

''अय्या, तुमचे डोके म्हणजे अगदी खोके आहे हो - व्यवहार ज्ञान म्हणून नाही - जरा मला विचारले असते तर बिघडले असते का? मला गिफ्ट देण्याऐवजी स्वत:लाच चांगला सफारी शिवला असता. मेलं निवृत्त झाल्यापासून एक नवीन कपडासुद्धा शिवला नाही. नुसते अल्टर - अल्टर. परवा माझी एक बालमैत्रिण भेटली होती. तिने कौतुकाने तुझे मिस्टर काय करतात म्हणून विचारले तर अभिमानाने मी मॅनेजर आहेत म्हणून सांगितले तर, तुमचा अवतार पाहून कोणत्या सर्कसमध्ये म्हणून विचारले. मंडळींचा टॉक टाईम संपत नव्हता आणि माझे हिअरींग अेड सापडत नव्हते. अहो, अहो, म्हणून मी थांबविण्याचा प्रयत्न केला पण मधेच बोललो तर दुप्पट ऐकावे लागते म्हणून मी विषय बदलून मोबाईल - इंटरनेट-टू जी- थ्री जी - फोर जी - जागतिकीकरण- घरबसल्या बँकींग डेबीट कार्ड-ऑन लाईन बुकींग- प्रवासाची आरक्षणे- ताजे घोटाळे-आणि लेटेस्ट म्हणजे पेंडींग कोर्ट केसचा कोर्टातील निकाल- सगळे क्षणात घरबसल्या मिळेल.

माझा 'आजतक' चॅनेल चालू होता -

''डोंबल तुमचे! - प्रत्यक्ष बँकेत गेलात तरी तुमची कामे धड होत नाहीत आणि म्हणे- ऑन लाईन. गेल्या पंधरवड्यात किती वेळा अेटीएम बंद होते आणि मेलं चालू झाले तर- पाचशे हजाराच्या नोटा- मोड कोण देणार? सुटे पैसे नसल्यामुळे घरात पिशवीभर चॉकलेट आणि गोळ्या जमा झाल्या आहेत. त्यापेक्षा बी पी किंवा डायबिटीसच्या गोळ्या दिल्या तर वरचे वर मेडिकल बील्स तरी सबमीट करावयास नको. यापेक्षा माझी 'बीबीसी' सर्व्हीस पहा - पहिली वाहिनी - सखुबाई मोलकरीण- ती आपल्या सोसायटीतील चार-पाच ठिकाणी काम करते. त्यामुळे कोणाकडे कोण आले - कोण गेले- कुठे काय घडले आणि कोणामुळे कोणाचे काय अडले ते कळते. बातम्या अगदी पहिल्या धारेच्या. आता बोलण्याचे नादात खोल्यांचा केर चांगला नाही निघाला तरी चालतो. कारण आपल्याच सोसायटीत धुळ फार आहे. त्याला ती तरी बापडी काय करणार? तिचा नवरा रात्री अपरात्री दारू पिऊन घरी, मुलीला जावई नीट नांदवत नाही, आईला बरे नसते म्हणून घराकडे पैसे पाठवावे लागतात असे सांगितल्यावर मी पाच पन्नास ॲडव्हान्स म्हणून दिले तर एकसुद्धा कामाचा खाडा करीत नाही. दुसरी वाहिनी म्हणजे 'धुणी भांडीवाली' आहेत सख्या बहिणी आणि सख्या जावा. एकच ठेवली तर सगळेच अडते म्हणून दोन. हा चॅनेल तर

अखंड असतो आणि हल्ली पाणी टंचाईमुळे भांडी विसळतात आणि कपडे बुचकळून पिळतात. 'घासणे', 'धुणे' हे शब्द विसरा. या दोघी जणी फार हुशार आहेत. यांची म्हणे युनियन आहे. आपल्या असोसिएशनपेक्षा भारी. संप-मोर्चा-निदर्शने केली तर वडा पाव आणि वर शंभर दोनशे मिळतात. याशिवाय घरटी दिवाळीचा बोनस, वर्षाला एक साडी आणि आपल्या घरी पाहुणा आला मग माहेरचा असला तर फुकट. पण सासरचा असला तर दुप्पट पैसे. आता मोलकरणींना पण पेन्शन मिळणार आहे. सुप्रीम कोर्टात न जाता. तिसरा चॅनल म्हणजे पोळीभाजी करणारी 'ताईबाई' या हल्ली चक्क स्कुटीवर येतात. यांच्या हाताला तर निराळीच चव आहे. त्यातून मी जर कणिक भिजवून ठेवली आणि भाजी चिरून ठेवली तर त्यांची दोन घरची कामे जरा जास्त होतात. आम्हाला दोन तीन घरचे कव्हरेज जास्त मिळते म्हणून मीच सांभाळून घेते. फास्टफूडपेक्षा बेस्ट आणि नो वेस्टेजेस. याशिवाय सर्व वृत्तांचे कन्फर्मेशन स्वयंपाक घरातील खिडकी उघडी ठेवल्यावर मिळते. बातम्यांचे आदान प्रदान, शंकाकुशंकांचे निरसन, यामुळे एखादे वेळेस गॅसवर ठेवलेल्या दुधाला भरती येते पण दुधात भेसळ असते ना? दूध ते दूध पाणी ते पाणी.

आनंदी संसारातील व्यवहार ज्ञान चार बुके शिकून मिळणार नाही हे नक्की. सरतेशेवटी अमृतमहोत्सवाचे गिफ्ट देण्याचा अविचार सोडून दिला. झोपेसाठी डोळे मिटता मिटता मला एक दोन ब्रेकींग न्यूज मिळाल्या की 'ए' विंग मधल्या साहेबांची धाकटी मुलगी 'बी' विंग मधल्या वॉचमनचे मुलाबरोबर कालपासून बेपत्ता आहे आणि दुसरी म्हणजे सुप्रीम कोर्टाचे केसबद्दल. वाट बघून बघून आता डोक्याला टक्कल पडले. गल्ली ते दिल्ली - घोटाळे-घोटाळे त्यांचे वेटोळे एवढे मोठे की आयुष्याचा हत्ती गेला पण शेपूट अडकलेच ना? पेन्शन वाढ मिळाली तर वरदान आणि नाही मिळाली तर शाप. तोपर्यंत सौभाग्यवतींचे इंटरनेटवरच आमचे समाधान.

- **मधुकर पालकर**, पुणे
दूरध्वनी - ०२०-२४४७१७६६

## विनोद

**पत्नी** (पतीस) - समजा, उद्यापासून स्वयंपाकीण बाईंना सुटी देऊन मी जर रोज स्वयंपाक करून जेवण तयार केलं तर मला काय मिळेल ?
**पती** - माझ्या विमा पॉलिसीचे पैसे.

- श्री. प्रभाकर गुपचूप,
पुणे

## नजर

त्या भव्य मंदिरात गर्जे
डोळे मिटून जो तो
परी गाभाऱ्यात बडव्यांचा
रखडला जखडला तो देव

शांति-सुखाची द्वाही
याचितो काही बाही !
बाजार पाहिला मी
बेजार पाहिला मी !

रूग्णालयात दिसते
उषा कुठे उगवते
परि रूग्ण तो शेजेवरीचा
धन्वंतरीत लोभाचा

वर्दळ वेदनांची
आशा तुटे कुणाची !
लाचार पाहिला मी
आजार पाहिला मी !

'झुकती है दुनिया'
थाटून आश्रमास बसले
परि भोळ्या मनी भक्तीचा
जटा-दाढीत वासनेचा

जाणून हे सत्य थोर
बिलंदर महा-चोर !
अविचार पाहिला मी
व्याभिचार पाहिला मी !

भ्रम-भ्रमात गुंतलो रे
नि:शंक नमावे ऐसे
चंद्र-सूर्यावरही कलंकित
अहिंसेवरी रूधिराचा

जावे कुठे कळेना
स्थान कोठे दिसेना !
डाग पाहिला मी
शिडकाव पाहिला मी!

- **गोविंद करमरकर**, सांगली

## स्वातंत्र्यवीर

विजनवास भोगिला अंदमानी
नाउमेद ना झाला परी मनी
यमराजास हुलकावणी देऊनी
कर्मयोग आचरला जीवनी

दान ते केले सर्वस्वाचे
मोचन करण्या मातृभूमीचे
दमन करण्या परशत्रुचे
रक्त सांडिले आप्तजनांचे

साहस अपुले हिमालयासम
वसा घेतला आपण खडतर
रखरखत्या मार्गे चालतात
कदापि ना उरी तयाची खंत
रथ स्वातंत्र्याचा आला दौडत

- द. श्री. विद्वांस, बदलापूर
भ्रमणध्वनी - ९४०३८१०८९५

# प्रतिक्रिया

संवाद म्हणजे जणू घरकूलच. घरातील व्यक्ती जशा घरातील माणसांना हिताच्या गोष्टी सांगतात, सुचवतात अगदी तसंच.

आता या आपल्या एप्रिल २०१२ च्या अंकातच बघा ना. किती सहजपणे श्री. बी. के. घोष व श्री. ए. के. कुलकर्णी यांनी स्वदेशीचं महत्त्व सांगितलं आहे. 'Save the Indian Rupee' हा लेख म्हणजे जणू स्वदेशीची चळवळच.

अतिशय कळकळीने त्यांनी रूपयाची उतरण कशी होत आहे ते सांगितले आहे. तसेच त्याचे दूरगामी परिणामही काय होणार आहेत याचा संक्षिप्त आढावा दिला आहे.

मी हा लेख वाचला आणि असं वाटलं हे असं आपण पूर्वीच का सुरू केले नाही. आता मात्र त्यांनी जी स्वदेशी कंपन्यांची उत्पादने दिली आहेत तीच खरेदी करणार आणि याबद्दल इतर अनेक लोकांचेही प्रबोधन करणार आहे.

श्री. घोष आणि श्री. कुलकर्णी यांचे मनापासून अभिनंदन.

धन्यवाद.

**- सौ. मिनल स्नेहल गोरे,** डोंबिवली (प.)

****

'संवाद' एप्रिलचा अंक मिळाला. या अंकातील कल्पना कोठारे यांची 'निमित्त' ही कविता, श्री एम. भगत यांची 'नेताजी खड्डेराव', त्याचप्रमाणे उज्वल ब्रह्मांडकर यांची 'प्रतिभेच्या कला' ह्या तिन्ही कविता खूपच छान वाटल्या. जाता जाता आपल्याला ह्या खूप काहीतरी सांगून जातात. रिटायर झाल्यावर ज्येष्ठ नागरिकांना घरातही विशेषत: स्वयंपाकघरात फारच लुडबुड करावीशी वाटते. कारण त्यांचा वेळ चांगला जातो. ह्या सर्वाचे वर्णन 'निमित्त' ह्या कवितेत छान केले आहे.

'नेताजी खड्डेराव' ह्या कवितेत पुढाऱ्यांची आश्वासने कशी असतात ह्याचे उत्तम वर्णन केले आहे. 'प्रतिभेच्या कला' ह्या कवितेत संगीत कशाकशावर चालतं ह्याचं सुंदर वर्णन केले आहे. कल्पनांचा आविष्कार खूप छान आहे त्यामुळे ती वाचनीय निश्चितच आहे.

'संत सुलभाबाई' हा संपदा वागळे यांचा लेख खूपच छान आहे. मदतीचा हात देणाऱ्या एका स्त्रीचे मनोगत ह्यात सुंदर रेखाटले आहे.

'संवाद'च्या सर्व टीमला माझा मनापासून नमस्कार. आपण करत असलेल्या कामाबद्दल आपल्याला शुभेच्छा देणे व असाच 'सुंदर संवाद' दर महिन्याला आमच्या भेटीस येवो.

**- निलिमा दि. कुलकर्णी,** पुणे

****

तुमचे 'संवाद' मासिक मला फार आवडते. एस बी आयचे कितीतरी अधिकारी कवी, लेखक आहेत. त्यांचे लिखाण वाचून झाल्यावर मी आठवण ठेवून त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचे कौतुक करतो. माझी प्रामाणिक प्रतिक्रिया देतो. एप्रिल २०१२ च्या अंकात रत्नागिरीचे श्री. नाफडे (लेख - हृदयातील प्रकाश.) ह्यांचा लेख, संपदा वागळे यांचा सुलभाबाईवरचा लेख तर मला माझ्या धाकट्या बहिणीची आठवण देऊन गेला.

मे महिन्याच्या अंकात वैद्य श्री. दांडेकर, सातारा ह्यांचा संधिवातावरचा लेख माहितीपूर्ण असून सर्व ज्येष्ठात आत्मविश्वास निर्माण करणारा आहे.

**- सु. वि. कशेळीकर,** पुणे

****

'संवाद' एप्रिल २०१२ अंकातील श्री. आठवले ह्यांचे संपादकीय Thought Providing आहे. निवृत्तीनंतर उगाच नैराश्य आल्यास एकूण परिस्थितीवर मात कशी करावी हे तर्कशास्त्र पटले.

पेन्शनर्सच्या सुप्रीम कोर्टातील केस विषयी खुलासेवार तपशील 'संवाद' देत आहे ह्याचे समाधान आहे. सर्वश्री लळिंगकर, शर्मा, बी.के.घोष, ए.के.कुलकर्णी ह्यांचे लिखाण मननीय आहे. 'संवाद'च्या सादरीकरणाबद्दल संपादक मंडळास धन्यवाद.

**- अविनाश निमदेव,** अमरावती

****

'संवाद' एप्रिल २०१२ मधील संपदा वागळे लिखित 'संत सुलभाबाई' लेख खूप भावला. सौ. सुलभा व आम्ही इतर मैत्रिणी 'दया क्षमा शांती-स्टेट बँक कॉलनीतील लहानपणाच्या खास मैत्रिणी आहोत. आयुष्यातील गैरसोय हीच सोय मानून दुसऱ्याचे आयुष्य आनंदी करण्याचा सौ. सुलभाचा गुण संपदा वागळे ह्यांनी अचूक शब्दात शब्दबद्ध केलेला आहे. ह्याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद! अशा जगन्मैत्रिणीकडून आपणा सर्वांना खूप शिकण्यासारखे आहे. सुलभाताईंच्या आयुष्याच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

**- सौ. कविता मुरांजन,** बोरिवली (मुंबई)

*** आवाहन ***

**असोसिएशनच्या लीगल फंडाला सढळ हाताने मदत करा**

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## अंगाई गीत

अंगाई गीत आता, झाले फार जुने
येईना झोप, बाळा, नवे काही हवे

डोरेमॉन, शिनचॅन, टॉम आणि जेरी
मीकी आणि डोनाल्ड, सोबत भीमसुद्धा छोटा
थकले रे सारे, बाळा, झोपी जा आता

मिटलेल्या पापणीचा, आजी घेई मुका
म्हणे नीज बाळा आता, देते आजी तुला झोका

इवल्या इवल्या पंखांनी, परी घाली वारा
म्हणे नीज बाळा आता, तुला आजी देते झोका

स्वप्नातली परी बाळा, झाली खरी खुरी
जगती या म्हणतात, आजी तिला सारी

**- नी. व. ओढेकर,** नासिक
भ्रमणध्वनी - ८९७५८२२८००

## देऊळ

देवा तुझ्या देऊळात
भक्त जमती लाखो लोक
थोडे असती खरे भक्त
बाकी सारे भगत भक्त ।।१।।

देह असतो देव्हाऱ्यात
चित्त परी खेटरात
स्वार्थी मन उंडारते
मनातल्या मनात ।।२।।

कुणा हवे पुत्ररत्न
कुणी मागती प्रमोशन
परीक्षेतल्या मार्कांसाठी
नैवेद्यांचे प्रलोभन ।।३।।

देवा तुझ्या देऊळात
भक्त जमती लाखो लोक

**- अरूण सावरकर,** मुंबई
भ्रमणध्वनी - ९९९२८१२८३८

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.